# सामाजिक/समांतर आरक्षण व त्यासाठी विहित केलेली कमाल वयोमर्यादा याबाबतचे आदेश

भाग

४३

**सरळसेवा प्रवेश व पदोन्नतीसाठी सुधारित बिंदू**
**नामावली विहित करण्याबाबत........**

महाराष्ट्र शासन
**सामान्य प्रशासन विभाग**
शासन निर्णय, क्रमांक बीसीसी. १०९७/प्र. क्र. २/९७/१६-ब,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २९ मार्च १९९७.

वाचा.—(१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी. १०९४/प्र. क्र. ६८/९४/१६-ब, दिनांक २६ जुलै १९९५.
(२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी. १०९४/३६०९/प्र. क्र. ५६/९४/१६-ब, दिनांक १५ सप्टेंबर १९९५.
(३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी. १०९४/३६०९/प्र. क्र. ५६/९४/१६-ब, दिनांक १५ फेब्रुवारी १९९६.

**प्रस्तावना.**— उपरोक्त दिनांक २६ जुलै १९९५ व दिनांक १५ सप्टेंबर १९९५च्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेल्या २०० बिंदू व ५० बिंदू नामावल्या मागे घेण्यात येत असल्याची घोषणा, दिनांक १९ डिसेंबर १९९५ रोजी विधान परिषदेत झालेल्या चर्चेच्या वेळी शासनातर्फे करण्यात आली. त्या अनुषंगाने, उपरोक्त क्रमांक ३ येथील दिनांक १५ फेब्रुवारी १९९६ च्या शासन निर्णयान्वये, घोषणेच्या दिनांकापासून म्हणजेच दिनांक १९ डिसेंबर १९९५ पासून, २०० बिंदू व ५० बिंदू नामावल्या मागे घेण्यात आल्या. मात्र दरम्यानच्या काळात कामकाजाची अडचण होऊ नये म्हणून तात्पुरती २०० बिंदू / ५० बिंदू नामावली विहित करण्यात आली. बिंदू नामावली सुधारित करण्याचा प्रश्न शासनाच्या काही काळ विचाराधीन होता.

**शासन निर्णय.**— सरळसेवा प्रवेशासाठी व पदोन्नतीसाठी बिंदू नामावल्या सुधारित करण्याच्या प्रश्नासंदर्भात शासनाने मा. उप मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठित केली होती. या समितीने केलेल्या शिफारशीनुसार सरळसेवा प्रवेशासाठी सुधारित १०० बिंदू नामावली व पदोन्नतीसाठी सुधारित ५० बिंदू नामावली याद्वारे विहित करण्यात येत आहेत. सुधारित बिंदू नामावलीचा नमुना सोबत जोडला आहे.

२. या निर्णयाच्या दिनांकापूर्वी ज्या प्रकरणी कार्यवाही पूर्ण झालेली आहे, त्याचे पुनर्विलोकन करण्याची आवश्यकता नाही. मात्र, यापुढे सरळसेवा भरती व पदोन्नतीसंदर्भात, सोबतची सुधारित बिंदू नामावली अनुसरण्यात यावी. विद्यमान बिंदू नामावलीनुसार यापूर्वी ज्या क्रमांकापर्यंतचे बिंदू वापरले आहेत. त्यापुढील बिंदू पासून सुधारित बिंदू नामावलीचा अवलंब करण्यात यावा. मात्र त्यापूर्वीचा अनुशेष असल्यास सरळसेवा भरती / पदोन्नती प्रसंगी विचारात घेण्यात यावा. विमुक्त जाती / भटक्या जमातीकरिता सरळसेवेसाठी " अ ", " ब ", " क " व " ड " या प्रवर्गातील आरक्षण अंतर्गत परिवर्तनीय (Internally transferable) राहील.

३. मंत्रालयीन विभागानी, सरळसेवा भरती व पदोन्नतीच्या वेळी, या सुधारित बिंदू नामावलीचा अवलंब करावा. तसेच त्यांच्या नियंत्रणाखाली सर्व शासकीय कार्यालयांना, या संदर्भात उचित सूचना देण्यात याव्यात. निमशासकीय सेवा, मंडळे, महामंडळे इत्यादीमध्ये, हे आदेश लागू करण्यासंबंधी संबंधित मंत्रालयीन विभागांनी योग्य ते आदेश निर्गमित करावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रवि भू. बुद्धीराजा,**
सचिव (सेवा).

## सरळसेवा भरतीसाठी १०० बिंदू नामावली

| अनुक्रमांक (१) | वर्ग (२) | अनुक्रमांक (१) | वर्ग (२) |
|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | ४२ | खुला |
| २ | अनुसूचित जमाती | ४३ | अनुसूचित जाती |
| ३ | विमुक्त जाती (अ) | ४४ | खुला |
| ४ | भटक्या जमाती (ब) | ४५ | इतर मागास वर्ग |
| ५ | इतर मागास वर्ग | ४६ | खुला |
| ६ | खुला | ४७ | भटक्या जमाती (ब) |
| ७ | भटक्या जमाती (क) | ४८ | खुला |
| ८ | खुला | ४९ | इतर मागास वर्ग |
| ९ | इतर मागास वर्ग | ५० | खुला |
| १० | खुला | ५१ | अनुसूचित जाती |
| ११ | भटक्या जमाती (ड) | ५२ | खुला |
| १२ | अनुसूचित जाती | ५३ | अनुसूचित जमाती |
| १३ | खुला | ५४ | खुला |
| १४ | खुला | ५५ | इतर मागास वर्ग |
| १५ | विशेष मागास वर्ग | ५६ | खुला |
| १६ | खुला | ५७ | भटक्या जमाती (क) |
| १७ | इतर मागास वर्ग | ५८ | खुला |
| १८ | खुला | ५९ | इतर मागास वर्ग |
| १९ | इतर मागास वर्ग | ६० | खुला |
| २० | खुला | ६१ | अनुसूचित जाती |
| २१ | अनुसूचित जाती | ६२ | खुला |
| २२ | खुला | ६३ | अनुसूचित जमाती |
| २३ | अनुसूचित जमाती | ६४ | खुला |
| २४ | खुला | ६५ | इतर मागास वर्ग |
| २५ | इतर मागास वर्ग | ६६ | खुला |
| २६ | खुला | ६७ | अनुसूचित जाती |
| २७ | अनुसूचित जाती | ६८ | खुला |
| २८ | खुला | ६९ | इतर मागास वर्ग |
| २९ | इतर मागास वर्ग | ७० | खुला |
| ३० | खुला | ७१ | अनुसूचित जमाती |
| ३१ | भटक्या जमाती (क) | ७२ | खुला |
| ३२ | खुला | ७३ | अनुसूचित जाती |
| ३३ | अनुसूचित जमाती | ७४ | खुला |
| ३४ | खुला | ७५ | इतर मागास वर्ग |
| ३५ | इतर मागास वर्ग | ७६ | खुला |
| ३६ | खुला | ७७ | भटक्या जमाती (ड) |
| ३७ | अनुसूचित जाती | ७८ | खुला |
| ३८ | खुला | ७९ | इतर मागास वर्ग |
| ३९ | इतर मागास वर्ग | ८० | खुला |
| ४० | खुला | ८१ | अनुसूचित जाती |
| ४१ | विमुक्त जाती (अ) | ८२ | खुला |

| (१) | (२) | (१) | (२) |
|---|---|---|---|
| ८३ | विमुक्त जाती (अ) | ९२ | खुला |
| ८४ | खुला | ९३ | अनुसूचित जमाती |
| ८५ | इतर मागास वर्ग | ९४ | खुला |
| ८६ | खुला | ९५ | इतर मागास वर्ग |
| ८७ | विशेष मागास वर्ग | ९६ | खुला |
| ८८ | खुला | ९७ | अनुसूचित जाती |
| ८९ | इतर मागास वर्ग | ९८ | खुला |
| ९० | खुला | ९९ | भटक्या जमाती (ब/क) |
| ९१ | अनुसूचित जाती | १०० | खुला. |

## वर्गानुसार आरक्षित पदे

| वर्गानुसार आरक्षित पदे | | बिंदू | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ अनुसूचित जाती (१३) | .. | १ | १२ | २१ | २७ | ३७ | ४३ | ५१ |
| | | ६१ | ६७ | ७३ | ८१ | ९१ | ९७. | |
| २ अनुसूचित जमाती (७) | .. | २ | २३ | ३३ | ५३ | ६३ | ७१ | ९३. |
| ३ विमुक्त जाती (अ) (३) | .. | ३ | ४१ | ८३. | | | | |
| ४ भटक्या जमाती (ब) (२.५) | .. | ४ | | ४७) | | | | |
| | | | | ) | | ९९(ब/क) | | |
| ५ भटक्या जमाती (क) (३.५) | .. | ७ | ३१ | ५७) | | | | |
| ६ भटक्या जमाती (ड) (२) | .. | ११ | ७७. | | | | | |
| ७ विशेष मागास प्रवर्ग (२) | .. | १५ | ८७. | | | | | |
| ८ इतर मागास वर्ग (१९) | .. | ५ | ९ | १७ | १९ | २५ | २९ | ३५ |
| | | ३९ | ४५ | ४९ | ५५ | ५९ | ६५ | ६९ |
| | | ७५ | ७९ | ८५ | ८९ | ९५. | | |
| ९. सर्वसाधारण (४८) | .. | ६ | ८ | १० | १३ | १४ | १६ | १८ |
| | | २० | २२ | २४ | २६ | २८ | ३० | ३२ |
| | | ३४ | ३६ | ३८ | ४० | ४२ | ४४ | ४६ |
| | | ४८ | ५० | ५२ | ५४ | ५६ | ५८ | ६० |
| | | ६२ | ६४ | ६६ | ६८ | ७० | ७२ | ७४ |
| | | ७६ | ७८ | ८० | ८२ | ८४ | ८६ | ८८ |
| | | ९० | ९२ | ९४ | ९६ | ९८ | १००. | |

**आर. के. सभरवाल आणि इतर विरुद्ध पंजाब राज्य प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाच्या अनुषंगाने आरक्षणाबाबतचे आदेश**

महाराष्ट्र शासन

**सामान्य प्रशासन विभाग**

शासन निर्णय, क्रमांक बीसीसी. १०९७/प्र. क्र. ६३/९७/१६-ब,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १८ ऑक्टोबर १९९७

## शासन निर्णय

सर्वोच्च न्यायालयाने आर. के. सभरवाल आणि इतर विरुद्ध पंजाब राज्य, यांच्या प्रकरणी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने असा निर्णय घेतला होता की, केंद्र शासनाने किंवा इतर राज्य शासनांनी आदेश निर्गमित केल्यानंतर, शासन त्याप्रमाणे आदेश निर्गमित करील.

२. केंद्र शासनाने त्यांच्या ज्ञापन क्रमांक ३६०१२/२/९६-इएसटीटी (आरईएस), दिनांक २ जुलै १९९७ अन्वये वरील याचिकेसंदर्भातील मार्गदर्शक तत्वासंबंधीचे आदेश निर्गमित केलेले आहेत. ते विचारात घेऊन, सेवाभरती व बिंदुनामावलीसंदर्भात, शासन खालील प्रमाणे आदेश देत आहे :—

(१) आरक्षण हे संवर्गाच्या पदसंख्येस (संवर्गातील एकूण पदांची संख्या विचारात घेऊन टक्केवारीनुसार) लावावे. रिक्त होणाऱ्या जागांच्या संदर्भात लावू नये. बिंदुनामावली ही आरक्षणाची विहित टक्केवारी पूर्ण होईपर्यंत वापरात ठेवावी. विहित टक्केवारी पूर्ण होताच बिंदुनामावली वापरण्याची आवश्यकता नाही. त्यानंतर ज्या प्रवर्गाची जागा रिक्त होईल त्या प्रवर्गातील कर्मचाऱ्यांद्वारे ती जागा भरण्यात यावी व त्या बिंदुपुढे तो बिंदु त्या प्रवर्गासाठी उपयोगात आणला अशी नोंद घ्यावी.

(२) गुणवत्तेवर नियुक्त झालेल्या मागासवर्गीय कर्मचाऱ्याची आरक्षण पदावर गणना करण्यात येऊ नये व त्याची नियुक्ती आरक्षण बिंदुवर दर्शवू नये. त्याची गणना खुल्या प्रवर्गात करावी.

(३) वर (१) येथे नमूद केल्यानुसार बिंदुनामावली ही रिक्त होणाऱ्या पदावर आधारित नसावी. ती संवर्गाच्या संख्येवर आधारित असावी.

(४) बिंदुनामावली ही मागासवर्ग प्रवर्गाचे आरक्षण निश्चित करण्यासाठी आहे. ज्येष्ठता निश्चित करण्यासाठी नाही.

(५) बिंदुनामावली वापरताना खालील मुलभूत तत्वे विचारात घ्यावीत--

(१) मागास प्रवर्गांना विहित केलेले आरक्षण हे टक्केवारीनुसार आसावे व एकूण आरक्षण हे प्रचलित आरक्षणानुसार संवर्गाच्या ५२ % पेक्षा जास्त असता कामा नये.

(२) सरळ सेवा भरतीसाठी आणि पदोन्नतीसाठी वेगळी बिंदुनामावली ठेवावी. या व्यतिरिक्त अन्य भरती माध्यम असल्यास, त्यासाठी देखील वेगळी बिंदुनामावली ठेवावी.

(६) बदली, प्रतिनियुक्तीच्या पदांना बिंदुनामावली वापरू नये.

(७) " मागासवर्गीयांना सेवेत आरक्षण व इतर सवलती " या पुस्तीकेतील प्रकरण १(अ) २पृ.१८/१९ यातील आदेश विचारात घेऊन छोट्या संवर्गाचे गट करण्यात यावेत.

(८) एकाकी पदास बिंदुनामावलीनुसार आळीपाळीने आरक्षण ठेवावे. सुरुवातीस अनुसूचित जाती व त्यानंतर खुला असे आळीपाळीने (आका आड एक) या तत्वावर याचे पालन व्हावे.

(९) यापुढे पदोन्नतीमध्ये भटक्या जमाती (क), धनगर व तत्सम यांना ३.५% व भटक्या जमाती (ड), वंजारी व तत्सम यांना २% आरक्षण विहित करण्यात येत आहे. नवीन १०० बिंदुनामावली सोबत जोडलेली आहे. ती १९९६-९७ च्या निवड सूची पासून अंमलात आणावी आणि तसे करताना बिंदु क्रमांक १ पासून ती वापरावी. हे आरक्षण त्या त्या निवड सूची वर्षापुरते राहील. तसेच ते " अ ", " ब ", " क " व " ड " या प्रवर्गातील अंतर्गत परिवर्तनिय (Internally Transferrable) राहील.

३. वरील आदेशानुसार बिंदुनामावलीचा वापर करण्यासंबंधीच्या सविस्तर सूचना सोबतच्या परिशिष्टात नमूद करण्यात आल्या आहेत. हे आदेश दिनांक २ जुलै, १९९७ पासून अंमलात येतील. त्यापूर्वी, तयार करण्यात आलेल्या निवड सूच्या अंतिम करण्यात आल्या असल्यास, त्यात बदल करण्याची आवश्यकता नाही. यापुढे सरळ सेवा भरती किंवा पदोन्नतीचे प्रस्ताव विचारात घेताना, त्या त्या संवर्गातील आरक्षित पदधारकांची संख्या विचारात घेऊन कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रवि भू. बूध्दीराजा,**
प्रधान सचिव (सेवा).

# परिशिष्ट

## बिंदुनामावलीचा वापर करण्यासंबंधीच्या सूचना

(१) सरळसेवा भरतीकरिता शासन निर्णय क्रमांक : बीसीसी-१०९७/प्र.क्र. २/१६-ब, दिनांक २९ मार्च १९९७ नुसार विहित बिंदुनामावली वापरण्यात यावी.

(२) सेवा प्रवेश नियमांनुसार प्रत्येक भरती माध्यमाकरिता (सरळसेवा व पदोन्नती इत्यादी) वेगवेगळी बिंदुनामावली दर्शा बिंदुनामावलीचा वापर करताना सेवा भरती नियमांतील तरतुदी विचारात घ्याव्यात.

३) बिंदुनामावली ही मागास प्रवर्गाचे आरक्षण निश्चित करण्यासाठी आहे. ज्येष्ठता निश्चित करण्यासाठी नाही.

(४) सध्या असलेली संवर्गातील पदसंख्या लक्षात घेऊन आरक्षण बिंदु निश्चित करण्यात यावेत. भविष्यात संवर्ग संख्येत वाढ झ घट झाल्यास, आरक्षण बिंदुची संख्या त्यानुसार त्या प्रमाणात जास्त अथवा कमी करण्यात यावी.

(५) जेथे सध्या विहित आरक्षणापेक्षा जास्त नियुक्त्या करण्यात आल्या आहेत त्यामुळे सध्याच्या तेथील नियुक्त्यांना बाधा

(६) सर्व मंत्रालयीन विभाग प्रमुखांनी यानुसार तातडीने कार्यवाही करून प्रत्येक संवर्गाबाबत वरील मार्गदर्शक सूचनेनुसार आ त्यानुसार कार्यवाही करावी.

(७) सध्या अस्तित्वात असलेले विविध शासन आदेश वरीलप्रमाणे सुधारण्यात आले असल्याचे गृहित धरण्यात यावे.

(८) पदोन्नतीच्या वाट्यातील पदे भरण्यासाठी निवडसूची बनविताना आणि पदोन्नतीच्या वाट्याबाहेरील अन्य पदांवर तात्पु देण्यासाठी पदोन्नती सूची बनविताना दोन वेगवेगळ्या बिंदुनामावल्या वापराव्यात.

## पदोन्नतीची १०० बिंदु नमुनेवजा नामावली

| | |
|---|---|
| १ | अनुसूचित जाती |
| २ | अनुसूचित जमाती |
| ३ | विमुक्त जाती (अ) |
| ४ | भटक्या जमाती (क) |
| ५ | खुला |
| ६ | खुला |
| ७ | भटक्या जमाती (ब) |
| ८ | खुला |
| ९ | खुला |
| १० | खुला |
| ११ | भटक्या जमाती (ड) |
| १२ | अनुसूचित जाती |
| १३ | खुला |
| १४ | खुला |
| १५ | विशेष मागास प्रवर्ग |
| १६ | खुला |
| १७ | खुला |
| १८ | खुला |
| १९ | खुला |
| २० | खुला |
| २१ | अनुसूचित जाती |
| २२ | खुला |
| २३ | अनुसूचित जमाती |
| २४ | खुला |
| २५ | खुला |
| २६ | खुला |
| २७ | अनुसूचित जाती |
| २८ | खुला |
| २९ | खुला |
| ३० | खुला |
| ३१ | भटक्या जमाती (क) |
| ३२ | खुला |
| ३३ | अनुसूचित जमाती |
| ३४ | खुला |
| ३५ | खुला |
| ३६ | खुला |
| ३७ | अनुसूचित जाती |
| ३८ | खुला |
| ३९ | खुला |
| ४० | खुला |
| ४१ | विमुक्त जाती (अ) |
| ४२ | खुला |
| ४३ | अनुसूचित जाती |
| ४४ | खुला |
| ४५ | खुला |
| ४६ | खुला |
| ४७ | भटक्या जमाती (ब) |
| ४८ | खुला |
| ४९ | खुला |
| ५० | खुला |
| ५१ | अनुसूचित जाती |
| ५२ | खुला |
| ५३ | अनुसूचित जमाती |
| ५४ | खुला |
| ५५ | खुला |
| ५६ | खुला |
| ५७ | भटक्या जमाती (क) |
| ५८ | खुला |
| ५९ | खुला |
| ६० | खुला |
| ६१ | अनुसूचित जाती |
| ६२ | खुला |
| ६३ | अनुसूचित जमाती |
| ६४ | खुला |
| ६५ | खुला |
| ६६ | खुला |
| ६७ | अनुसूचित जाती |
| ६८ | खुला |
| ६९ | खुला |
| ७० | खुला |
| ७१ | अनुसूचित जमाती |
| ७२ | खुला |
| ७३ | अनुसूचित जाती |
| ७४ | खुला |
| ७५ | खुला |
| ७६ | खुला |
| ७७ | भटक्या जमाती (ड) |
| ७८ | खुला |
| ७९ | खुला |
| ८० | खुला |
| ८१ | अनुसूचित जाती |
| ८२ | खुला |

| | | | |
|---|---|---|---|
| ८३ | विमुक्त जाती (अ) | ९२ | खुला |
| ८४ | खुला | ९३ | अनुसूचित जमाती |
| ८५ | खुला | ९४ | खुला |
| ८६ | खुला | ९५ | खुला |
| ८७ | विशेष मागास प्रवर्ग | ९६ | खुला |
| ८८ | खुला | ९७ | अनुसूचित जाती |
| ८९ | खुला | ९८ | खुला |
| ९० | खुला | ९९ | भटक्या जमाती (ब/क) (आळीपाळीने) |
| ९१ | अनुसूचित जाती | १०० | खुला. |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अनुसूचित जाती | (१३) | .. | १, | १२, | २१, | २७, | ३७, | ४३, | ५१, |
| | | | | ६१, | ६७, | ७३, | ८१, | ९१, | ९७. | |
| २. | अनुसूचित जमाती | (७) | .. | २, | २३, | ३३, | ५३, | ६३, | ७१, | ९३. |
| ३. | विशेष मागास प्रवर्ग | (२) | .. | १५, | ८७. | | | | | |
| ४. | विमुक्त जाती (अ) | (३) | .. | ३, | ४१, | ८३. | | | | |
| ५. | भटक्या जमाती (ब) | (२) | .. | ७, | ४७. | | | | | |
| ६. | भटक्या जमाती (क) | (३) | .. | ४, | ३१, | ५७. | | | | |
| ७. | भटक्या जमाती (ब/क) | (१) | .. | ९९. | | | | | | |
| ८. | भटक्या जमाती (ड) | (२) | .. | ११, | ७७. | | | | | |
| ९. | सर्वसाधारण | (६७) | .. | ५, | ६, | ८, | ९, | १०, | १३, | १४, |
| | | | | १६, | १७, | १८, | १९, | २०, | २२, | २४, |
| | | | | २५, | २६ | २८, | २९, | ३०, | ३२, | ३४, |
| | | | | ३५, | ३६, | ३८, | ३९, | ४०, | ४२, | ४४, |
| | | | | ४५, | ४६, | ४८, | ४९, | ५०, | ५२, | ५४, |
| | | | | ५५, | ५६, | ५८, | ५९, | ६०, | ६२, | ६४, |
| | | | | ६५, | ६६, | ६८, | ६९, | ७०, | ७२, | ७४, |
| | | | | ७५, | ७६, | ७८, | ७९, | ८०, | ८२, | ८४, |
| | | | | ८५, | ८६, | ८८, | ८९, | ९०, | ९२, | ९४, |
| | | | | ९५, | ९६, | ९८, | १००. | | | |

**शासन सेवेत सरळ सेवा भरतीसाठी समांतर आरक्षण (Horizontal reservation) कार्यान्वित करण्यासाठी अनुसरावयाची कार्यपद्धती विहित करण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन,

सामान्य प्रशासन विभाग,

परिपत्रक, क्रमांक एसआरव्ही. 1097/प्र.क्र. 31/98/16-अ,

मंत्रालय, मुंबई-400 032, दिनांक 16 मार्च 1999.

**वाचा.**— 1. शासन निर्णय, सा.प्र.वि., क्र. एसआरव्ही.1077/3576/1433/16-अ, दिनांक 23-5-1978.

2. शासन निर्णय, सा.प्र.वि., क्र. एसईएम.1080/35/16-अ, दिनांक 21-1-1980.

3. शासन निर्णय, सा.प्र.वि., क्र. आयपीई/आरटीए.1080/0/181/16-अ, दिनांक 10-10-1980.

4. शासन निर्णय, सा.प्र.वि., क्र. एसआरव्ही.1094/1004/प्र. क्र.-30/16-अ, दिनांक 17-11-1994.

5. शासन निर्णय, सा.प्र.वि., क्र. बीसीसी.1094/प्र.क्र.-68/94/16-ब, दिनांक 12-8-1994.

6. शासन निर्णय, न.व.वि., क्र. इक्यूआर.1094/प्र.क्र.-768/भूपुक1, दिनांक 9-8-1995.

7. शासन निर्णय, म.व.बा.क.वि., क्र. संकीर्ण.1096/प्र.क्र.-30/का.-2, दिनांक 1-8-1997.

8. शासन निर्णय, सा.प्र.वि., क्र. बीसीसी.1097/प्र.क्र.-2/97/16-ब, दिनांक 6-8-1997.

9. शासन परिपत्रक, सा.प्र.वि., क्र. एसआरव्ही.1097/12/प्र. क्र.-12/16-अ, दिनांक 2-5-1998.

10. अनिल कुमारगुप्ता वि. उत्तर प्रदेश राज्य आणि इतर (जेटी-1995 (5)एससी-505) या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या न्याय निर्णयातील मार्गदर्शक तत्त्वे.

**परिपत्रक.**— शासनाने सेवेतील भरतीसाठी मागासवर्गीयांसाठी आरक्षण लागू केले आहे. हे आरक्षण सामाजिक आरक्षण (Social Reservation) असल्याने ते उभे आरक्षण (Vertical Reservation) आहे. त्याचप्रमाणे विशेष आरक्षण (Special Reservation) मागासवर्गीयांव्यतिरिक्त अन्य घटकांसाठी लागू केलेल आहे व ते समांतर किंवा आडवे आरक्षण (Horizontal Reservation) आहे. या संदर्भात मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने (अॅपलेट साईड) रिट याचिका क्रमांक : 4067/1998 वरील निर्णयान्वये अनिलकुमार गुप्ता वि. उत्तर प्रदेश राज्य आणि इतर (जेटी-1995(5) एससी-505) या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या न्याय निर्णयास अनुसरून समांतर आरक्षणाबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार सेवेतील उभे आरक्षण व समांतर आरक्षणाच्या संदर्भात अनुसरावयाची कार्यपद्धती व त्या बाबतच्या मार्गदर्शक सूचना शासकीय/निमशासकीय सेवा, मंडळे/महामंडळे/ नगरपालिका/महानगरपालिका/जिल्हापरिषदा/शासकीय अनुदानप्राप्त संस्था/विद्यापिठे/सहकारी संस्था व शासकीय उपक्रम इत्यादींना लागू करण्यात यावे.

2. सेवेतील नियुक्तीसाठी सामाजिक आरक्षण (उभे आरक्षण) खालीलप्रमाणे आहे :—

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | अनुसूचित जाती | : | 13% |
| 2. | अनुसूचित जमाती | : | 7% |
| 3. | विमुक्त जाती (अ) | : | 3% |
| 4. | भटक्या जमाती (ब) | : | 2.5% |
| 5. | भटक्या जमाती (क) | : | 3.5% |
| 6. | भटक्या जमाती (ड) | : | 2% |
| 7. | विशेष मागासवर्ग प्रवर्ग | : | 2% |
| 8. | इतर मागस वर्ग | : | 19% |

वर नमूद केलेल्या आरक्षणाव्यतिरिक्त सेवेतील नियुक्त्यांसाठी लागू असलेले विशेष आरक्षण (समांतर आरक्षण) पुढीलप्रमाणे आहे :—

| | | |
|---|---|---|
| 1. | माजी सैनिक | 15% फक्त गट क आणि गट ड साठी |
| 2. | प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त | 5% फक्त गट क आणि गट ड साठी |
| 3. | अपंग | 3% गट अ आणि ब मधील काही पदांसाठी तसेच गट क आणि गट ड साठी |
| 4. | महिला | 30% |

समांतर आरक्षण हे फक्त सरळ सेवा भरतीस लागू राहील. समांतर आरक्षण हे सामाजिक आरक्षणांतर्गत आरक्षण असल्याने त्यास सामाजिक आरक्षणावर वाढीव म्हणून गणण्यात येऊ नये.

4. सर्वोच्च न्यायालयाच्या न्याय निर्णयात उल्लेखिलेल्या प्रमाणे समांतर आरक्षण हे कप्पीकृत आरक्षण (Compartmentalised Reservation) आहे, म्हणून पदे भरण्यापूर्वी, पदे निश्चित करताना तसेच भरतीची जाहिरात देताना त्या जाहिरातीत केवळ सामाजिक आरक्षणाची पदसंख्याच नमूद न करता सामाजिक आरक्षणाच्या प्रत्येक प्रवर्गामध्ये (उभे आरक्षण जसे अ.जा., अ.ज., वि.ज. (अ), भ.ज. (ब), भ.ज. (क), भ.ज. (ड), वि.मा.प्र., इ.मा.व. आणि खुला प्रवर्ग) विशेष आरक्षणनुसार येणाऱ्या राखीव पदांची संख्यासुद्धा निर्देशित करावी.

5. सर्वोच्च न्यायलयाच्या न्याय निर्णयात/उल्लेखिलेल्यानुसार संमातर आरक्षणांतर्गत त्या त्या प्रवर्गासाठी विहित करण्यात आलेल्या टक्केवारीनुसार वाटा निश्चितपणे मिळावा यासाठी सरळसेवा भरती करताना खालील टप्पे विचारात घेण्यात यावेत :—

(अ) प्रथम टप्पा :— गुणवत्तेच्या निकषानुसार खुल्या प्रवर्गातील उमेदवारांची निवड यादी करावी, या यादीत, समांतर आरक्षणात बसणाऱ्यांची संख्या पर्याप्त असेल तर कोणताही प्रश्न उद्भवणार नाही आणि त्यानुसार पदे भरावीत. जर समांतर आरक्षणाच्या प्रवर्गातील उमेदवारांची संख्या पर्याप्त नसेल तर समांतर आरक्षणाकरीता त्या त्या प्रवर्गातील उमेदवारांना उपलब्धतेनुसार पर्याप्त संख्येत यादीतील शेवटचे उमेदवार वगळून समाविष्ट करावेत.

(ब) दुसरा टप्पा :— त्यानंतर प्रत्येक सामाजिक आरक्षणाच्या प्रवर्गातील उमेदवारांच्या निवड याद्या तयार कराव्यात (जे उमेदवार यापूर्वीच टप्पा 'अ' मध्ये सामील झाले असतील त्यांना या यादीतून वगळावे.)

(क) तिसरा टप्पा :— वरील 'ब' नुसार तयार करण्यात आलेल्या याद्यांमध्ये सामजिक आरक्षणातील (Social Reservatation) प्रत्येक प्रवर्गाच्या विहित टक्केवारीनुसार 'अ' येथे विशद केलेल्या कार्यपद्धतीनुसार समांतर आरक्षणाचे पुरेसे उमेदवार समाविष्ट करावेत. मात्र असे करताना सामाजिक प्रवर्गांतर्गत राहावे.

6. सर्वोच्च न्यायलयाच्या न्याय निर्णयात उल्लेखिलेल्यानुसार विशेष आरक्षण हे प्रत्येक उभ्या आरक्षणाच्या कक्षांतर्गत राहील. म्हणजेच विशेष आरक्षण हे एका सामाजिक आरक्षण प्रवर्गातून दुसऱ्या सामाजिक आरक्षण प्रवर्गात स्थानांतरीत करता येणार नाही.

7. सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी वरील कार्यपद्धती तसेच सूचनांनुसार यापुढे न चुकता कार्यवाही करावी. हे आदेश शासकीय/निमशासकीय सेवा मंडळे/महामंडळे/नगरपालिका/महानगरपालिका/जिल्हापरिषदा/शासकीय अनुदानप्राप्त संस्था/विद्यापिठे/सहकारी संस्था व शासकीय उपक्रम इत्यांदींना लागू करण्यात यावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**भि. रा. वाढवे,**

अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

शासकीय सेवेत गट " क " आणि " ड "
सेवा भरतीची एकत्रित मार्गदर्शक तत्त्वे.

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन परिपत्रक क्र. न्याप्र.-२००३/९९/प्र. क्र. २/०३ (भाग-२)/१६-अ, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक : २५ ऑक्टोबर २००५

वाचा.—(१) शासन परिपत्रक सा.प्र.वि. क्र. एसआरव्ही. १०९७/प्र. क्र. ३१/९८/१६अ, दिनांक १६ मार्च १९९९. (सहपत्र-१)

(२) शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र. बीसीसी. १०९७/प्र. क्र. २/९७/१६ब, दिनांक २९ मार्च १९९७. (सहपत्र-२)

(३) शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र. बीसीसी. १०७९/प्र. क्र. ६३/९७/१६ब, दिनांक १८ ऑक्टोबर १९९७. (सहपत्र-३)

(४) शासन परिपत्रक, सा.प्र.वि. क्र. आयपीई/आरटीए/१०७९/०/४८३/१६अ, दिनांक १० ऑक्टोबर १९८०. (सहपत्र-४)

(५) शासन परिपत्रक, सा.प्र.वि. क्र. आरटीए. १०७९/०/४८२/१६अ, दिनांक १६ एप्रिल १९८१. (सहपत्र-५)

(६) शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र. एईएम. १०८०/३५/१६अ, दिनांक २१ जानेवारी १९८०. (सहपत्र-६)

(७) शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र. एसआरव्ही. १०९४/प्र. क्र. ३०/९७/१६अ, दिनांक १७ नोव्हेंबर १९९४. (सहपत्र-७)

(८) शासन परिपत्रक, सा.प्र.वि. क्र. प्रकल्प. १०००/प्र. क्र. २७/२०००/१६अ, दिनांक १३ सप्टेंबर २०००. (सहपत्र-८)

(९) शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र. एसआरव्ही. १०७७/३५७६/१४३३/१६अ, दिनांक २३ मे १९७८. (सहपत्र-९)

(१०) अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग), अधिनियम, १९९५, या अधिनियमाच्या कलम-३२ व ३३ चा उतारा.) (सहपत्र-१०)

(११) शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र. एसआरव्ही. १०९७/प्र. क्र. १२२/९७/१६अ, दिनांक २ मे १९९८. (सहपत्र-११)

(१२) शासन निर्णय, महिला व बाल कल्याण विभाग क्र. संकीर्ण. १०९६/प्र. क्र. ३०/का. २, दिनांक १ ऑगस्ट १९९७. (सहपत्र-१२)

(१३) शासन निर्णय, महिला व बाल कल्याण विभाग क्र. ८२/२००१/मसेआ-२०००/प्र. क्र. ४१५/का. २, दिनांक २५ मे २००१. (सहपत्र-१३)

(१४) शासन निर्णय, शालेय शिक्षण आणि क्रिडा विभाग क्र. राक्रिएधो. २००२/प्र. क्र. ६८/क्रीयुसे-२, दिनांक ३० एप्रिल २००५. (सहपत्र-१४)

(१५) शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र. एईएम. १०१२/३६५५/प्र. क्र. ९०/९२/१६अ, दिनांक ३१ मे १९९३. (सहपत्र-१५)

(१६) शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र. पअंक. १०९७/१७९३/प्र. क्र. ४/९८/१६अ, दिनांक १९ मार्च १९९८. (सहपत्र-१६)

(१७) शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र. अकंप. १००४/प्र. क्र. ५१/०४/आठ, दिनांक २२ ऑगस्ट २००५. (सहपत्र-१७)

(१८) शासन परिपत्रक, सा.प्र.वि. क्र. संकीर्ण. १००३/प्र. क्र. ९६/०३/१३अ, दिनांक १९ नोव्हेंबर २००३. (सहपत्र-१८)

(१९) शासन परिपत्रक, सा.प्र.वि. क्र. एसआरव्ही. २००५/प्र. क्र. ४७/०५/१२, दिनांक २५ ऑगस्ट २००५. (सहपत्र-१९)

(२०) शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र. एसआरव्ही. २००४/प्र. क्र. १२/०४/१२, दिनांक ७ जून २००४. (सहपत्र-२०)

(२१) शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र. प्रनिम. ३००४/प्र. क्र. ३२/२००४/१३अ, दिनांक ९ जून २००४ (सहपत्र-२१)

(२२) शासन अधिसूचना, सा.प्र.वि. क्र. एसआरव्ही. २०००/प्र. क्र. (१७/२०००)/बारा, दिनांक २८ मार्च २००५. (सहपत्र-२२)

(२३) शासन परिपत्रक, सा.प्र.वि. क्र. एसआरव्ही. २०००/प्र. क्र. १७/२०००/१२, दिनांक १ जुलै २००५. (सहपत्र-२३)

## परिपत्रक

मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, खंडपीठ, औरंगाबाद यांनी मूळ अर्ज क्र. ७२०/०१, क्र. ८४६/०४, संकीर्ण अर्ज क्र. १६४/०५ व इतर वर दिनांक १८ नोव्हेंबर २००२ व दिनांक ५ सप्टेंबर २००५ रोजी दिलेल्या सूचना विचारात घेऊन त्यानुसार गट-क व गट-ड पदावरील सेवाभरतीसाठीची पाळावयाची तत्वे एकत्रित करून ती सर्व संबंधितांच्या निदर्शनास खालीलप्रमाणे आणून देण्यात येत आहेत—

महाराष्ट्र शासनाने सेवाभरती योजनेत गट " क " व गट " ड " पदांसाठी काही घटकांना आरक्षण दिले आहे. हे आरक्षण सर्वसाधारणपणे दोन भागात विभागले गेले आहे. पहिल्या भागातील आरक्षण हे अनुसूचीत जाती, अनुसूचीत जमाती, विमुक्त/भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग आणि इतर मागासवर्गीयांसाठी देण्यात अले आहे. या अराक्षित घटकांना सामाजिक/उभे आरक्षण म्हणून संबोधले जाते. या व्यतिरिक्त शासनाने प्रकल्पग्रस्त, माजी सैनिक, महिला, अपंग इत्यादी घटकांसाठी सेवाभरतीत विशेष आरक्षण ठेवले आहे. या आरक्षणाची तपशीलवार माहिती शासन परिपत्रक, सामन्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही. १०९७/प्र. क्र. ३१/९८/१६अ, दिनांक १६ मार्च १९९९ (सहपत्र-१) मध्ये दिलेली आहे.

२. **मागासवर्गीयांसाठी आरक्षण** (सामाजिक आरक्षण)

सामाजिक आरक्षणाची रिक्त पदे बिंदू नामावलीनुसार भरली जातात ज्यामध्ये कोणत्या प्रवर्गातील उमेदवारास कोणत्या क्रमांकाच्या बिंदूवर निवडावयाचे याची माहिती देण्यात आलेली आहे. जर बिंदू नामावलीनुसार एखादे पद आरक्षित असेल तर त्या प्रवर्गाशिवाय ते पद इतर प्रवर्गामधून भरता येत नाही. त्या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध झाला नाहीतर ते पद रिक्त ठेवावे लागते व भविष्यात होणाऱ्या भरतीसाठी त्या प्रवर्गाचा अनुशेष म्हणून आरक्षण पुढे ओढून सदर बिंदू त्याच प्रवर्गाच्या उमेदवारातून भरला जातो. मागासवर्गीयांच्या आरक्षणाचा अनुशेष कसा निश्चित करावा याबाबत शासन निर्णय, क्र. बीसीसी. १०९७/प्र क्र. २/९७/१६ब, दिनांक २९ मार्च १९९७ (सहपत्र-२) मध्ये सूचना दिल्या आहेत. बिंदू नामावली संबंधीचा तपशील स्पष्ट करण्यासाठी शासन निर्णय, सा.प्र.वि., क्र. बीसीसी. १०७९/प्र. क्र. ६३/९७/१६ब, दिनांक १८ ऑक्टोबर १९९७ (सहपत्र-३) अवलोकन करावा. त्यानुसार बिंदूनामावली ही आरक्षणाची विहित टक्केवारी पूर्ण होईपर्यंत वापरात ठेवावयाची आहे. ज्या प्रवर्गाची विहित टक्केवारी पूर्ण होईल त्या प्रवर्गाकरिता बिंदू नामावली वापरण्याची आवश्यकता राहणार नाही ; त्यानंतर ज्या प्रवर्गाचे पद रिक्त होईल ते त्या प्रवर्गातील कर्मचाऱ्याच्या नियुक्तीद्वारे भरण्यात यावे व त्या बिंदू पुढे तो बिंदू त्या प्रवर्गासाठी उपयोगात आणला आहे अशी नोंद घ्यावयाची आहे.

महाराष्ट्र राज्यात सामाजिक आरक्षणाबाबत विधानमंडळाने महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या व विमुक्त जाती विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग) अधिनियम, २००४ म्हणून पारित केलेला आहे.

३. **विशेष/समांतर आरक्षण**

समांतर आरक्षण हे कप्पीकृत (compartmentlised) आरक्षण आहे. ज्याला सामाजिक आरक्षणामध्ये विशेष आरक्षण असे म्हणता येईल. कोणत्याही विशेष आरक्षण प्रवर्गाला एका कप्यामधून दुसऱ्या कप्प्यामध्ये नेता येत नाही. विशेष आरक्षण प्रवर्गाच्या उमेदवाराच्या निवडीची प्रक्रिया सामाजिक आरक्षणाच्या अधीन राहून कशी केली जावी हे सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक १६ मार्च १९९९ मध्ये नमूद करण्यात आलेले आहे. (सहपत्र-१).

(अ) **माजी सैनिक आरक्षण.**—माजी सैनिकांना १५% विशेष आरक्षण असून शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. आयपीई/आरटीए/१०७९/०/४८३/१६अ, दिनांक १० ऑक्टोबर १९८० (सहपत्र-४) मध्ये त्याबाबतचा तपशील नमूद करण्यात आला आहे. शासन परिपत्रक, सा. प्र. वि., क्र. आरटीए. १०७९/०/४८२/१६अ, दिनांक १६ एप्रिल १९८१ (सहपत्र-५) अन्वये माजी सैनिकांना कमाल वयोमर्यादा ४५ वर्षेपर्यंत शिथिल करण्यात आलेली आहे.

(ब) **प्रकल्पग्रस्त आरक्षण.**—प्रकल्पग्रस्त व्यक्तींकरीता ५% पर्यंत विशेष आरक्षण देण्यात आले आहे. यासंदर्भात शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एईएम. १०८०/३५/१६अ, दिनांक २१ जानेवारी १९८० अन्वये आदेश निर्गमित केले आहेत. (सहपत्र-६) काही प्रकरणांमध्ये ३ वर्षापर्यंत वयोमर्यादा शिथिल केली आहे. तसेच प्रकल्पग्रस्तांसाठी असलेल्या आरक्षणामध्ये प्रकल्पग्रस्तांबरोबरच भूकंपग्रस्तांचाही समावेश केलेला आहे. यासंदर्भातील शासन निर्णय, सा. प्र. वि., क्र. एसआरव्ही. १०९४/प्र. क्र. ३०/१६-अ, दिनांक १७ नोव्हेंबर १९९४ (सहपत्र-७) मधील सूचना विचारात घ्याव्यात. महाराष्ट्र प्रकल्पग्रस्त पुनर्वसन अधिनियम, २००१ मधील प्रकल्पग्रस्त व्यक्तीच्या/नामनिर्देशीत व्यक्तीच्या रोजागाराकरीता ५% कोटा विहीत केलेला आहे. प्रकल्पग्रस्त अथवा त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्ती यांना शासकीय सेवेतील गट-क आणि गट-ड मधील पदावर नियुक्ती देण्याबाबत अनुसरावयाची कार्यपद्धती शासन परिपत्रक, सा.प्र.वि., क्र. प्रकल्प. १०००/प्र. क्र. २७/२०००/१६-अ, दिनांक १३ सप्टेंबर २००० (सहपत्र-८) अन्वये स्पष्ट केलेले आहे.

(क) **अपंगासाठी आरक्षण.**—शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही. १०७७/३५७६/१४३३/१६अ, दिनांक २३ मे १९७८ अन्वये शासनाने गट क आणि ड मधील पदांमध्ये अंध, बहिरेपणा आणि अस्थिव्यंग अपंगाकरिता विशेष आरक्षणांतर्गत प्रत्येकी १% याप्रमाणे एकूण ३% पदे राखीव ठेवण्याचे आदेश दिले आहेत. सदर शासन निर्णय आणि त्यासंबंधीत इतर शासन निर्णय सहपत्र-९ प्रमाणे आहेत. त्यानंतर केंद्र शासनाच्या अपंग व्यक्ती (समान संधी, हक्काचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग), अधिनियम, १९९५ च्या कलम ३२ व ३३ मध्ये अंध (अल्पदृष्टी/दृष्टीहिनता), बहिरेपणा व अस्थिभंग व्यक्तींकरीता शासनाच्या सेवेतील सर्व स्तरावरील पदांमधून अपंग व्यक्तीच्या नियुक्तीयोग्य ठरविलेल्या संवर्गात एकूण ३% आरक्षण ठेवण्याबाबत तरतूद करण्यात आली आहे. यासंदर्भात शासन सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही. १०९७/प्र. क्र. १२२/९७/१६अ, दिनांक २ मे १९९८ (सहपत्र-११) अवलोकन करावे.

(ड) **महिलांसाठी आरक्षण.**—सन १९९७ मध्ये महिलांकरिता ३०% पदे आरक्षित ठेवण्याबाबत शासनाने आदेश निर्गमित केले. सदरचे आरक्षण शासनाकडील सर्व गटातील पदांकरीता ठेवण्यात आले आहे. या संदर्भातील शासन निर्णय, महिला व बाल कल्याण विभाग, क्रमांक संकीर्ण १०९६/प्र. क्र. ३०/का. २, दिनांक १ ऑगस्ट १९९७ आणि क्र. ८२/२००१/मसेआ. २०००/प्र. क्र. ४१५/का. २, दिनांक २५ मे २००१ (सहपत्र-१२ आणि १३) अन्वये निर्गमित केलेले आहेत.

(ई) **खेळाडूंसाठी आरक्षण.**—ज्या खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय स्पर्धामध्ये भाग घेतला आहे आणि काही पारितोषिके प्राप्त केली आहेत अशा खेळाडूंसाठी सेवाभरतीत ५% एवढे विशेष आरक्षण नव्याने लागू केले आहे. शासन निर्णय, शालेय शिक्षण आणि क्रिडा विभाग क्र. सक्रयो-२००२/प्र. क्र. ६८/क्रीयुसे-२, दिनांक ३० एप्रिल २००५ (सहपत्र-१४) अवलोकीत करावेत.

४. **पसंतीक्रम**

सामाजिक आरक्षण तसेच विशेष आरक्षणाव्यतिरिक्त इतर काही प्रवर्गाना (घटकांना) शासन सेवेत प्रतिनिधित्व देण्यासाठी जसे स्वांतंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशीत व्यक्ती, संपकालीन कर्मचारी, १९८१ चे जनगणना कर्मचारी, १९९१ चे जनगणना कर्मचारी आणि अंशकालीन पदवीधारक बेरोजगार यांच्याकरिता सेवाभरतीमध्ये पसंतीक्रम दर्शविले आहेत. यासंदर्भात शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र एईएम. १०९२/३६५५/प्र. क्र ९०/९२/१६अ, दिनांक ३१ मे १९९३ आणि पअंक. १०९७/१७९३/प्र. क्र ४/९८/१६अ, दिनांक १९ मार्च १९९८ (सहपत्र १५ व १६) विचारात घ्यावेत.

५. **अनुकंपा तत्त्वावर नियुक्ती**

गट-क व ड मधील मृत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबातील एका सदस्यास काही अटींवर केवळ गट-क व ड मधील पदांवर अनुकंपा तत्त्वावर नियुक्ती देण्याबाबत शासनाचे धोरण आहे. पदासाठी विहित केलेल्या शैक्षणिक अर्हता आणि सेवाप्रवेश नियमांतील तरतुदी पूर्ण करणाऱ्या कुटुंबियांतील पात्र सदस्याला, त्यासाठी ठेवण्यात येणाऱ्या प्रतिक्षा सूचीतील क्रमानुसार गट-क व ड मधील पदावर नियुक्ती देण्यात येते. यासंबंधी अलिकडेच निर्गमित केलेल्या शासन निर्णय, क्रमांक अकंपा. १००४/प्र. क्र. ५१/०४/आठ, दिनांक २२ ऑगस्ट २००५ (सहपत्र-१७) स्वयंस्पष्ट आहे.

६. **सर्वोच्च न्यायालयाचे न्यायनिर्णय**

(अ) मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील ॲप्लीकेशन क्रमांक ११६४६/११७२४/१९९६ प्रकरणी शासकीय/निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनेतील रिक्त पदे भरण्याबाबत असे निर्देश दिले आहेत की, रिक्त पदाबाबत सर्व प्रसारमाध्यमातून जसे वर्तमानपत्रे, दूरदर्शन, रेडीओ, नोटीस बोर्ड, रोजगार पत्र इत्यादीमध्ये जाहिरात प्रसिद्ध करून अर्ज मागविण्यात यावेत. अशा प्रकारे प्राप्त होणाऱ्या सर्व अर्जांचा निवडीसाठी विचार करण्यात यावा. सर्वोच्च न्यायालयाच्या उपरोक्त निर्देशाच्या अनुषंगाने शासनाने सा.प्र. वि., क्र. संकीर्ण. १००३/प्र. क्र. ९६/०३/१३अ, दिनांक १९ नोव्हेंबर २००३ रोजी परिपत्रक निर्गमित केले आहे. (सहपत्र क्र. १८)

(ब) मा. सर्वोच्च न्यायालयाने ए. उमराणी विरुद्ध रजिस्टार को. ऑप. सोसायटी, तामिळनाडू राज्य व इतर याप्रकरणी असे निर्देश दिले आहेत की, शासकीय, निमशासकीय व सार्वजनिक उपक्रमामध्ये पदे भरताना नियुक्ती विहीत मार्गाने करणे शासनावर बंधनकारक आहे. विहित कार्यपद्धती व नियमाचे पालन न करता मागीलदारांने अनियमितपणे केलेल्या नेमणुका नियमित कराण्यात येऊ नयेत असे स्पष्ट निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिलेले आहेत. त्याअनुषंगाने शासन परिपत्रक, सा.प्र.वि. क्र. एसआरव्ही. २००५/प्र. क्र. ४७/०५/१२, दिनांक २५ ऑगस्ट २००५ रोजी निर्गमित केले आहेत. (सहपत्र-१९).

७. **निवड करण्यासाठी घ्यावयाची लेखी व तोंडी परीक्षा**

मा. सर्वोच्च न्यायालयाने शासकीय, निमशासकीय व सार्वजनिक उपक्रमामध्ये रिक्त पदे भरण्याबाबत वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार पात्रता परीक्षा व मुलाखात घेऊन त्या आधारे गुण ठरविण्यासंबंधी विहित कार्यपद्धती अवलंबिण्याच्या दृष्टीने शासन निर्णय, क्रमांक एसआरव्ही. २००४/ प्र. क्र. १२, /०४/१२ दिनांक ७ जून २००४ व शासन निर्णय, क्रमांक प्रानिम. ३००४/प्र. क्र. ३२, २००४/१३अ, दिनांक ९ जून २००४ निर्गमित केले असून त्याच्या प्रती अनुक्रमे सहपत्र-२० व २१ म्हणून जोडले आहे.

गुणवत्ता यादी मध्ये जर एकापेक्षा जास्त उमेदवार एकाच क्रमांकावर असतील तर पसंतीक्रमाच्या प्राथम्यानुसार उमेदवाराची निवड करावयाची आहे.

८. **कुटुंब लहान राखण्याचे प्रतिज्ञापत्र**

शासन सेवेत प्रवेश करू इच्छिणाऱ्या व्यक्तीसाठी दोनपेक्षा अधिक अपत्य असण्यावर निर्बंध घालणाऱ्या शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही. २०००/प्र. क्र. (१७/२०००)/बारा, २८ मार्च २००५ मधील तरतुदी देखील विचारात घ्याव्यात. (सहपत्र-२२) यासंदर्भात लहान कुटुंबाची अतिरिक्त अट पदांच्या जाहिरातीत समाविष्ट करणे आणि सेवाप्रवेश करणाऱ्या उमेदवारांकडून कुटुंब लहान राखण्यासाठी विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र घेणे नियुक्ती अधिकाऱ्यांना अनिवार्य करण्याबाबतच्या शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही. २०००/ प्र. क्र. १७/२०००/१२, दिनांक १ जुलै २००५ मधील सूचना देखील विचारात घेण्यात याव्यात. (सहपत्र-२३)

९. निवड प्रक्रिया करताना जिल्हा निवड समिती व प्रादेशिक निवड समिती तसेच नियुक्ती प्राधिकारी यांनी वरील प्रमाणे निरनिराळे निर्देश विचारात घेऊन गट-क व ड पदावर उमेदवाराची निवड करावयाची आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

र. ग. पवार,
शासनाचे उप सचिव.

प्रति,

१. राज्यपालांचे सचिव,
२. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३. उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
४. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
५. मुख्य सचिव,
६. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
*७. प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई,
*८. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
*९ प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई,
*१०. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, मुंबई,
*११. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
*१२. सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई,
*१३. राज्यनिवडणूक आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई
*१४. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
*१५. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
१८. सर्व विभागीय आयुक्त,
१९. सर्व जिल्हाधिकारी/जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२०. राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे सर्व व्यवस्थापकीय संचालक,
२१. संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई (प्रसिद्धपत्रक काढण्याच्या विनंतीसह).
२२. मंत्रालयीन विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख,
२३. मंत्रालयीन सर्व विभाग,
२४. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
२५. निवड नस्ती.

* पत्राने

GR-200407151630240001-0100

**अपंग व्यक्तींना शासकीय व शासनाच्या अधिपत्याखालील सेवेतील गट-अ ते गट-ड मधील पदांवर सरळ सेवेने नियुक्ती देण्यासंबंधात उच्च वयोमर्यादा शिथिल करण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय, क्र.एसआरव्ही-१०९८/प्र.क्र.३९/९८/१६-अ
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १६ जून, २००१.

संदर्भ :- १) शासन निर्णय, सा.प्र.वि., क्र.एसआरव्ही-१०७७/३५७६/१४३३/१६-अ, दि.२३.५.७८.
२) शासन निर्णय, सा.प्र.वि., क्र.एसआरव्ही-१०८१/३२७३/१६-अ, दि.१.३.८३.

**शासन निर्णय**

अपंग व्यक्तींकरीता शासकीय सेवेत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील गट-क आणि गट-ड मधील पदांवरील नियुक्तीसाठी संदर्भाधिन क्र.१ च्या शासन निर्णयान्वये उच्च वयोमर्यादा ४५ वर्षांपर्यंत शिथिल करण्यात आली होती. तसेच संदर्भाधिन क्र.२ च्या आदेशान्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेमधील लिपिक वर्गीय पदांच्या स्पर्धात्मक परीक्षेसाठी अपंग उमेदवारांसाठी उच्च वयोमर्यादा १० वर्षांपर्यंत शिथिल करण्यात आली आहे.

२. तथापि गट-अ आणि गट-ब मधील पदांसाठी उच्च वयोमर्यादेत सवलत देण्यात आलेली नव्हती. केंद्र शासनाच्या अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम १९९५ मधील कलम ३८ (१) (बी) नुसार अपंग व्यक्तींना शासकीय सेवेतील नियुक्तीसाठी उच्च वयोमर्यादेत सवलत देण्याची तरतूद विहित करण्यात आली असल्यामुळे अपंग व्यक्तींची शासकीय सेवेत सरळ सेवेने नियुक्ती करताना उच्च वयोमर्यादेत देण्यात आलेल्या सवलतीत एकसूत्रता असावी, असा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

३. यासंदर्भात शासनाचे आदेश आहेत की, राज्य शासनाच्या सेवेतील व राज्य शासनाच्या अधिपत्याखालील कार्यालयातील गट-अ ते गट-ड मधील पदांवर महाराष्ट्र लोकसेवा आयोग अथवा अन्य मार्गाने केल्या जाणाऱ्या सरळसेवा नियुक्तींसंबंधात अपंग व्यक्तींसाठी उच्च वयोमर्यादा सरसकट ४५ वर्षांपर्यंत शिथिल करण्यात यावी.

ही सवलत आदेशाच्या दिनांकापासून लागू होईल. त्यामुळे या विभागाच्या संदर्भाधिन क्र.१ व २ च्या आदेशानुसार देण्यात आलेल्या उच्च वयोमर्यादेच्या सवलती या आदेशाच्या दिनांकापासून आपोआप रद्द होतील.

४. हे आदेश शासकीय/निमशासकीय सेवा, मंडळे/महामंडळे, नगरपालिका/महानगरपालिका, जिल्हा परिषदा, शासकीय अनुदानप्राप्त संस्था, आणि ज्यांना मार्गदर्शक आदेश देण्याचा अधिकार शासनाला आहे, अशी इतर सर्व प्राधिकरणे, सेवा व संस्था यांना लागू राहतील.

५. महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(स्वाक्षरी)
( द. वा. देशपांडे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

**शासकीय, निमशासकीय व शासन अनुदानित संस्थांमधील सेवांमध्ये भरतीसाठी महिलांकरिता ३० टक्के जागा आरक्षित ठेवणेबाबत.**

महाराष्ट्र शासन

**महिला व बालविकास विभाग**

शासन निर्णय, क्र. ८२/२००१/मसेआ-२०००/प्र. क्र. ४१५/का-२,

नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,

दिनांक २५ मे २००१.

**निर्णय.**--शासकीय, निमशासकीय व शासन अनुदानित संस्थांमधील सेवांमध्ये भरतीसाठी महिलांकरिता ३० टक्के जागा दिनांक १ एप्रिल १९९४ पासून राखीव ठेवण्यात आल्या आहेत. सदर ३० टक्के आरक्षणाच्या अंमलबजावणीबाबत परिशिष्ट-१ मध्ये नमूद केलेल्या शासन निर्णयाद्वारे वेळोवेळी सूचना निर्गमित केलेल्या आहेत. सदर सर्व शासन निर्णय अधिक्रमीत करण्यात येत असून महिलांच्या ३० टक्के आरक्षणाच्या अंमलबजावणीबाबत खालीलप्रमाणे एकत्रित आदेश देण्यात येत आहेत. हा शासन निर्णय निर्गमित होण्यापूर्वी महिलांच्या ३० टक्के आरक्षणासंदर्भात करण्यात आलेली कार्यवाही ही परिशिष्ट-१ मध्ये नमुद केलेल्या शासन निर्णयानुसार करण्यात आली आहे असे समजण्यात यावे.

<u>(एक) आरक्षणाची व्याप्ती, अटी व शर्ती</u>

(१) शासकीय, निमशासकीय व शासन अनुदानित संस्था यांच्या सेवेत नियुक्तीसाठी महिलांकरीता ३० टक्के जागा आरक्षित ठेवण्यात येत आहेत.

(२) महिलांच्या सदर आरक्षणाची अंमलबजावणी करतांना अनु.जाती, अनु.जमाती, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास प्रवर्ग आणि खुला प्रवर्ग यांचेसाठी जी पदे उपलब्ध होतील त्या पदांपैकी त्या त्या प्रवर्गातील महिलांसाठी ३० टक्के जागा राखीव ठेवण्यात याव्यात.

(३) महिलांचे आरक्षण हे समांतर आरक्षण राहील व ते कार्यान्वित करण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाच्या परिपत्रक क्र. एसआरव्ही-१०९७/प्र.क्र. ३१/९८/१६-अ, दिनांक १६ मार्च १९९९ मधील मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करावी. (प्रत सोबत जोडली आहे) सदर मार्गदर्शक सूचनांमध्ये सामान्य प्रशासन विभागाकडून काही बदल केल्यास सदर बदल आपोआप लागू होतील.

(४) महिलांसाठी विहित करण्यात आलेले सदर ३० टक्के आरक्षण हे फक्त सरळसेवा भरतीसाठी अनुज्ञेय राहील.

(५) महिला आरक्षण हे समांतर आरक्षण/विशेष आरक्षण असल्यामुळे ते आडवे आरक्षण आहे. समांतर आरक्षण हे कप्पीकृत आरक्षण असल्यामुळे पदे भरण्यापूर्वी, पदे निश्चित करताना तसेच भरतीची जाहिरात देताना त्या जाहिरातीत महिला आरक्षणानुसार येणाऱ्या राखीव पदांची संख्या, सामाजिक आरक्षण/उभे आरक्षण यांच्या (जसे अ.जा., अ.ज., विजा.(अ), भ.ज.(ब), (क), (ड), वि.मा.प्र., इ.मा.व., आणि खुला प्रवर्ग) प्रत्येक वर्गामध्ये निर्देशित करावी.

(६) महिलांसाठीचे सदर आरक्षण हे मागासवर्गीयांचे आरक्षण ज्या ज्या ठिकाणी लागू आहे त्या सर्व ठिकाणी लागू राहील.

(७) भरतीच्या वर्षात त्या त्या प्रवर्गातील महिला उमेदवार उपलब्ध झाल्या नाहीत तर सदर आरक्षण इतरत्र अदलाबदल न करता त्या त्या प्रवर्गातील पुरूष उमेदवारांमार्फत भरण्यात यावे.

(८) महिलांच्या आरक्षणाचा अनुशेष पुढे ओढण्यात येवू नये.

(९) खुल्या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती/कुटुंबातील (क्रिमीलेअर) महिला सदस्यांना महिलांसाठी असलेले ३० टक्के आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही. तसेच, मागासवर्गीय प्रवर्गातील इतर मागासवर्ग, भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड) या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती अथवा गटातील महिला सदस्यांना महिलांचे ३० टक्के आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.

(१०) खुल्या प्रवर्गातील ज्या व्यक्तींचे/कुटुंबाचे सर्व मार्गांनी येणारे एकूण वार्षिक उत्पन्न सलगच्या मागील तीन वर्षामध्ये प्रत्येक वर्षी रुपये दोन लाख किंवा त्यापेक्षा अधिक असले ती व्यक्ती/कुटुंब उन्नत आणि प्रगत व्यक्ती/गट म्हणून समजण्यात येईल. या संदर्भातील कुटुंबाच्या व्याख्येमध्ये विवाहीत महिलेच्या बाबतीत पती, पत्नी, व मुले यांचा समावेश राहील. आणि अविवाहीत मुलीच्या संदर्भात आई, वडील व अविवाहीत भावंडे यांचा समावेश राहील.

(११) इतर मागासवर्ग, भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड) यांचेकरीता उन्नत आणि प्रगत व्यक्ती अथवा गट (क्रिमीलेअर) बाबत सामाजिक न्याय विभागाने वेळोवेळी निश्चित केलेले निकष व अटी लागू राहतील.

(१२) सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभागामार्फत इतर मागासवर्गासाठी उन्नत आणि प्रगत व्यक्ती/गट (क्रिमीलेअर) याबाबतची उत्पन्न मर्यादा वाढविल्यास सदर वाढीव उत्पन्न मर्यादा खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी आपोआप लागू राहील.

(१३) मागासवर्गीयांचे आरक्षित प्रवर्ग आणि खुला प्रवर्ग यांना सेवा भरतीसाठी जे सेवाभरती नियम अटी व शर्ती लागू आहेत तेच सेवाभरती नियम, अटी व शर्ती त्या त्या प्रवर्गातील महिलांसाठीच्या अरक्षणाबाबातही लागू राहतील.

(१४) महिला आरक्षणाच्या अंमलबजावणीचे सनियंत्रण महिला व बाल विकास विभागामार्फत करण्यात यावे.

(१५) महिलांच्या अरक्षित पदांच्या लाभाकरिता उमेदवार महाराष्ट्र राज्याचा सर्वसाधारणपणे रहिवासी असावा.

**(दोन) प्रमाणपत्रे**

**(अ) खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी क्रिमीलेअरचे प्रमाणपत्र व त्याची तपासणी**

(१) खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी उन्नत आणि प्रगत व्यक्ती व गट (क्रिमीलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यासाठी तहसिलदार व नायब तहसिलदार यांना सक्षम अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. याबाबतचा अर्जाचा नमुना व प्रामाणपत्राचा नमुना परिशिष्ट २ व ३ म्हणून सोबत जोडला आहे.

(२) वरील प्रमाणपत्राच्या आधारे ज्या महिलांना आरक्षणाचा लाभ देण्यात येईल त्यांची प्रमाणपत्रे तपासण्यास आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना सक्षम अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

(३) महाराष्ट्र लोकसेवा आयोग अथवा इतर सक्षम प्राधिकाऱ्यांकडून महिलांच्या आरक्षित पदावर नेमणूकीकरिता ज्या महिलांची शिफारस होईल त्यांची प्रमाणपत्रे व त्यांनी आरक्षित पदांकरिता केलेला अर्ज संबंधित विभागांनी/कार्यालयांनी आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे-१, यांचेकडे तपासणीसाठी पाठवावा.

(४) आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे-१, यांनी सदर प्रमाणपत्र या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनांनुसार आहे किंवा नाही हे तपासावे. तसेच, सदर प्रमाणपत्राच्या पृष्ठ्यर्थ संबंधित उमेदवाराने या शासन निर्णायातील परिशिष्ट-२ मधील अर्जान्वये प्रमाणपत्र मिळण्याकरिता जी माहिती सादर केली असेल ती माहिती मुळ कागदपत्रांवरून तसेच आवश्यक वाटल्यास गृहभेटी देवून तपासून घ्यावी व सर्व माहिती योग्य असल्याचे आढळून आल्यास प्रमाणपत्र प्रमाणित करुन संबंधित कार्यालयांना परत पाठवावे.

(५) जर एखाद्या प्रमाणपत्राबाबत आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना शंका असल्यास त्यांनी याबाबतचा सविस्तर तपशील आपल्या अहवालात नमूद करावा.

(६) ज्या उमेदवारांची प्रमाणपत्रे आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे-१, यांनी तपासून प्रमाणित केली असतील त्या उमेदवारांची महिलांच्या आरक्षित पदावर नेमणूक करण्यास हरकत नाही.

(७) आयुक्त महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे-१, यांनी प्रमाणपत्र तपासणीचा अहवाल एक महिन्यात संबंधित कार्यालयांना पाठवावा.

(८) आयुक्तांचा अहवाल एक महिन्यात प्राप्त झाला नाही तर संबंधित कार्यालयांनी प्रमाणपत्र पडताळणीच्या अधिनतेने संबंधित उमेदवारास तात्पुरती नेमणूक द्यावी.

(९) ज्या उमेदवारांच्या प्रमाणपत्रांबाबत शंका उपस्थित झाली असेल अशा उमेदवारांच्याबाबतीत आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे-१, यांनी स्वतःच्या सहीने आपल्या शंका संबंधित जिल्हा दंडाधिकारी यांना अ.शा. गोपनिय पत्राद्वारे कळवाव्यात व त्यांचा अहवाल ठराविक कालमर्यादेत मागवावा.

(१०) आयुक्त महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे-१, यांनी उपस्थित केलेल्या शंका संबंधित जिल्हा दंडाधिकाऱ्यांना मान्य असल्यास त्यांनी संबंधित प्रमाणपत्र रद्द करावे.

**(ब) मागासवर्गीय उमेदवारांची प्रमाणपत्रे व त्यांची तपासणी**

(१) अनु. जाती, अनु. जमाती, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग यामधील महिलांनी त्यांच्या प्रवर्गातील महिला आरक्षणाच्या लाभाकरिता त्या त्या प्रवर्गात मोडत असल्याचे प्रमाणपत्र आदिवासी विकास विभाग, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग अथवा विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग यांनी वेळोवेळी दिलेल्या सूचनांनुसार सादर करणे आवश्यक राहील व सदर प्रमाणपत्रे तपासण्याबाबत आदिवासी विकास विभाग आणि सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग यांनी जी कार्यपद्धती विहीत केली आहे तीच कार्यपद्धती अंमलात राहील.

**(क) मागासवर्गीय उमेदवारांची खुल्या प्रवर्गातील महिलांच्या आरक्षित पदावर नियुक्ती झाल्यास त्याबाबतची प्रमाणपत्रे व त्याची तपासणी.**

(१) मागासवर्गीयांच्या प्रवर्गातील ज्या महिला उमेदवार खुल्या प्रवर्गातील जागांकरिता विकल्प देतील किंवा विकल्प न देताही मागासवर्गीयांच्या प्रवर्गातील ज्या महिला उमेदवारांची निवड खुल्या प्रवर्गातील महिलांच्या आरक्षित पदांवर झाल्यास, अशा महिला उमेदवारांना प्रमाणपत्र सादर करण्याबाबत खालील दोन विकल्प राहतील.

(अ) अशा महिला उमेदवारांनी समाजिक न्याय विभाग, आदिवासी विकास विभाग अथवा विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग यांनी विहीत केल्याप्रमाणे त्यांच्या संबंधित जातीची

प्रमाणपत्रे सादर करावीत व ती त्या विभागांनी विहित केलेल्या कार्यपद्धतीनुसार तपासून घेण्यात यावीत. अशा महिला उमेदवारांकडून खुल्या प्रवर्गातील महिलांकरीता विहित केलेले क्रिमीलेअरचे प्रमाणपत्र घेण्याची आवश्यकता राहणार नाही.

(ब)१ जर त्या त्यांच्या संबंधित जातीचे प्रमाणपत्र सादर करू इच्छित नसतील किंवा सादर करू शकत नसतील तर अशा महिला उमेदवारांनी खुल्या प्रवर्गातील महिलांप्रमाणे या शासन निर्णयाच्या परिशिष्ट ३ नुसार विहित केलेले उन्नत व्यक्ति/गट (क्रिमीलेअर) मध्ये मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. त्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

(१) या शासन निर्णयाच्या परिशिष्ट-२ नुसार संबंधित तहसिलदार/नायब तहसिलदार यांचेकडे क्रिमीलेअरच्या प्रमाणपत्रासाठी अर्ज करावा.

(२) वर नमूद केलेल्या उमेदवारांनी उन्नत व्यक्ती/गट (क्रिमीलेअर) मध्ये मोडत नसल्याबाबतच्या प्रामाणपत्रासाठी अर्ज केल्यास, तहसिलदार व नायब तहसिलदार यांनी अशा उमेदवारांना खुल्या प्रवर्गाप्रमाणेच उन्नत व्यक्ति/गट (क्रिमीलेअर) मध्ये मोडत नसल्याचे प्रमाणपत्र द्यावे.

(३) हे प्रमाणपत्र देण्यासाठी तहसिलदार व नायब तहसिलदार यांना सक्षम अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. याबाबतच्या अर्जाचा नमुना व प्रमाणपत्राचा नमुना या शासन निर्णयाच्या परिशिष्ट २ व ३ प्रमाणे राहील.

(४) वरील प्रमाणपत्र तपासणीसाठी या शासन निर्णयाच्या परिच्छेद (दोन) (अ) मध्ये नमूंद केलेली कार्यपद्धती अवलंबिण्यात यावी.

(तीन) हे आदेश तात्काळ अंमलात येतील.

(चार) हा शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक २९/१६-अ, दिनांक ३ एप्रिल २००१ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**चंद्रसेन तुरकर,**
अवर सचिव, महाराष्ट्र राज्य.

## परिशिष्ट-१

**शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, क्र. ८२/२००१/मसेआ-२०००/प्रक्र. ४१५/का-२, दिनांक २५ मे २००१ चे परिशिष्ट-१**

**वाचा.**—(१) शासन निर्णय, महिला व बाल कल्याण विभाग, क्रमांक संकीर्ण. १०९३/प्र.क्र. ३६६/का-२, दिनांक २२ जून १९९४.

(२) शासन परिपत्रक, महिला व बाल कल्याण विभाग, क्रमांक संकीर्ण. १०९५/प्र.क्र. २१६/का-२, दिनांक १३ ऑक्टोबर १९९५.

(३) शासन निर्णय, महिला व बाल कल्याण विभाग, क्रमांक संकीर्ण. १०९३/प्र.क्र. ३६६/का-२, दिनांक १६ ऑक्टोबर १९९५.

(४) शासन निर्णय, महिला व बाल कल्याण विभाग, क्रमांक संकीर्ण. १०९६/प्र.क्र. ३०/का-२, दिनांक २७ मे १९९७.

(५) शासन निर्णय, महिला व बाल कल्याण विभाग, क्रमांक संकीर्ण. १०९६/प्र.क्र. ३०/का-२, दिनांक १ ऑगस्ट १९९७.

(६) शासन निर्णय, महिला व बाल कल्याण विभाग, क्रमांक संकीर्ण. १०९६/प्र.क्र. ३०/का-१०, दिनांक १८ फेब्रुवारी १९९८.

(७) शासन परिपत्रक, महिला व बाल कल्याण विभाग, क्रमांक संकीर्ण. १०९६/प्र.क्र. ३०/का-१०, दिनांक १२ मे १९९८.

(८) शासन निर्णय, महिला व बाल कल्याण विभाग, क्रमांक संकीर्ण. १०९८/प्र.क्र. ८०/का-१०, दिनांक २ नोव्हेंबर १९९८.

(९) शासन परिपत्रक, महिला व बाल कल्याण विभाग, क्रमांक संकीर्ण. १०९६/प्र.क्र. ३०/का-२, दिनांक २२ जून २०००.

604

(शासन निर्णय, क्र. ८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र. ४१५/का-२, दिनांक २५ मे २००१ चे परिशिष्ट-२)

## परिशिष्ट-२

खुल्या प्रवर्गातील महिलांकरिता शासकीय, निमशासकीय व शासन अनुदानित संस्थांमधील सेवांमध्ये भरतीसाठी असलेल्या ३० टक्के आरक्षणाच्या सवलतीसाठी उन्नत व्यक्ती/गट (क्रिमीलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबत प्रमाणपत्र मिळण्यासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना :—

प्रति,

तहसिलदार/नायब तहसिलदार,

महोदय,

मी आपणांस विनंती करते की, खुल्या प्रवर्गातील महिलांकरिता शासकीय, निमशासकीय व शासन अनुदानित संस्थांमधील सेवांमध्ये भरतीसाठी असलेल्या ३० टक्के आरक्षणाच्या सवलतीसाठी मला कृपया उन्नत व्यक्ती/गट (क्रिमीलेअर) मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे, अशी विनंती आहे.

मी माझी माहिती खालीलप्रमाणे नमूद करीत आहे :—

(१) अर्जदाराचे पूर्ण नाव :

(२) जन्म दिनांक :

(३) निवासाचा पूर्ण पत्ता

(अ) सध्याचा :

(ब) कायमचा :

(४) धर्म :

(५) जात :

(६) वडीलांचे नाव :

(७) आईचे नाव :

(८) पतीचे नाव :

(९) पालकांचा/पतीचा व्यवसाय :

(१०) पालकांच्या/पतीच्या उत्पन्नाचा तपशिल :

(११) (अ) पालक/पती नोकरी करीत असल्यास

(१) वडीलांच्या/पतीच्या नोकरीचे ठिकाण (कंपनी/कार्यलयाचे नाव) :

(२) पदनाम :

(३) मागील तीन वर्षाचे वर्ष निहाय एकूण वार्षिक वेतन (सर्व भत्त्यांसह) :

(४) आईचे नोकरीचे ठिकाण (कंपनी/कार्यालयाचे नाव) :

(५) पदनाम :

(६) मागील तीन वर्षाचे वर्ष निहाय एकूण वार्षिक वेतन (सर्व भत्त्यांसह) :

(७) कुटुंबाचे एकूण उत्पन्न (तिन वर्षाचे वर्षनिहाय) अ. क्र. ३ + ७ :

(ब) पालक/पती व्यवसाय करीत असल्यास :

(१) व्यवसायाचे नाव :

(२) व्यवसायाचे ठिकाण :

(३) व्यवसायातून मिळालेले मागील तीन वर्षाचे वर्ष निहाय एकूण उत्पन्न. :

मी असे प्रमाणित करते की, वर नमुद केलेली माहिती माझ्या समजूतीप्रमाणे व विश्वासाने खरी आहे आणि म्हणून मी उन्नत व्यक्ती/गट (क्रिमीलेअर) मध्ये मोडत नाही. त्यामुळे खुल्या प्रवर्गातील महिलांसाठीच्या आरक्षणाच्या लाभासाठी मी पात्र आहे. जर मी वर नमूद केलेली माहिती खोटी अथवा दिशाभूल करणारी आहे, असे निवड होण्यापूर्वी किंवा नंतर आढळून आल्यास माझी निवड/नियुक्ती रद्दबातल ठरविण्यास पात्र असेल. तसेच कायदा किंवा नियमांद्वारे विहित असणाऱ्या कारवाईस मी पात्र असेल.

आपली,

(उमेदवाराची सही)

644

ठिकाण :

दिनांक :

(शासन निर्णय, क्र. ४२/२००१/मसेआ-२०००/प्र. क्र. ४१५/का-२, दिनांक २५ मे २००१ चे परिशिष्ट-३)

## परिशिष्ट-३

खुल्या प्रवर्गातील महिलांकरिता शासकीय, निमशासकीय व शासन अनुदानित संस्थांमध्ये ठेवण्यात आलेल्या ३० टक्के आरक्षणाच्या सवलतीकरिता उन्नत व्यक्ती/गट (क्रिमीलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबतच्या प्रमाणपत्राच्या नमुना :—

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग क्र. संकीर्ण-२०००/प्र.क्र. ४१५/का-२, दिनांक २२ मे २००१ अन्वये विहित केलेल्या खुल्या प्रवर्गातील महिलांकरिताच्या उन्नत व्यक्ती/गट (क्रिमीलेअर) प्रवर्गामध्ये कुमारी/श्रीमती .................................................................. यांच्या कुटुंबियांचे लगतच्या मागील ३ वर्षाचे सर्व मार्गांनी मिळून एकूण उत्पन्न वार्षिक सरासरी रुपये २ लाखाच्या आत असल्याने त्या खुल्या प्रवर्गातील उन्नत व्यक्ती/गट (क्रिमीलेअर) मध्ये मोडत नाहीत.

सही

(सक्षम अधिकारी)

ठिकाण :

शिक्का :

अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना शासकीय, निमशासकीय व इतर क्षेत्रात नोकरीसाठी आरक्षण ठेवण्याबाबत

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय, क्र. राक्रीधो. २००२/प्र.क्र. ६८/क्रीयुसे-२,

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० एप्रिल २००५

**प्रस्तावना.**—राष्ट्राच्या व राज्याच्या सांस्कृतिक जीवनामध्ये क्रीडा संस्कृतीस अनन्यसाधारण महत्व आहे. राष्ट्राच्या प्रगतीमध्ये त्या राष्ट्राची व पर्यायाने राज्याची क्रीडा क्षेत्रातील कामगिरी हा एक महत्वाचा मानदंड आहे. त्यामुळे वेगवेगळ्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये पदके प्राप्त करणारे खेळाडू राष्ट्रास अथवा राज्यासाठी लौकिक प्राप्त करून देत असतात.

२. खेळाडूचे खेळातील करिअरचे वय व शैक्षणिक करिअरचा काळ एकच असल्याने त्यांना दोन्ही आघाडींवर सारख्याच प्रमाणात लक्ष देता येणे शक्य नसते. त्यामुळे बऱ्याचदा शैक्षणिक प्राविण्यात त्यांची पिछेहाट होते व त्यामुळे नोकरी व्यवसायाच्या स्पर्धेत ते केवळ शैक्षणिक करिअर करणाऱ्या विद्यार्थ्यांशी स्पर्धा करू शकत नाहीत. खेळाचा उमेदीचा काळ संपल्यानंतर अशा गुणवत्ताधारक खेळाडूंना नोकरीसाठी वणवण भटकावे लागते. यामुळे खेळाडू अथवा त्यांचे पालक खेळाकडे करिअर म्हणून पहात नाहीत व खेळास पूर्णवेळ योगदान देण्यापासून ते परावृत्त होतात.

३. राज्याचे व राष्ट्राचे नाव उज्जवल करणाऱ्या खेळाडूंना उदरनिर्वाहाची खात्री मिळाल्यास ते खेळातील प्राविण्य वाढविण्याकडे अविचलपणे लक्ष देतील म्हणून खेळाडूंना शासकीय व इतर नोकऱ्यांमध्ये आरक्षण ठेवण्याची मागणी विविध क्षेत्रातून व विशेषत: क्रीडा क्षेत्राकडून मोठ्या प्रमाणावर येत होती. त्याबाबत आता विचार करून शासनाने, शासनाच्या विविध विभागात व शासनाच्या मालकीच्या व नियंत्रणाखाली असलेल्या महामंडळात, स्थानिक प्राधिकरणात व विविध स्वरूपात शासकीय सवलती प्राप्त केलेल्या संस्थांमध्ये, अत्युच्च गुणवत्ताप्राप्त खेळाडूंसाठी नोकऱ्यांमध्ये आरक्षण ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

## शासन निर्णय

शासकीय व निमशासकीय कार्यालयांमधील गट-अ, ब, क व ड संवर्गातील नामनिर्देशनाने भरण्यात येणाऱ्या पदांपैकी ५ % पदे विशेष कामगिरी बजावणाऱ्या स्त्री व पुरुष खेळाडूंसाठी आरक्षित असावीत. मात्र हे आरक्षण ५२ % पेक्षा अधिक असणार नाही.

निर्णयाचे स्वरूप व त्याच्या ठळक बाबी खालीलप्रमाणे आहेत :—

### (१) आरक्षण लागू करावयाच्या सेवा व कार्यालये

नामनिर्देशनाने भरावयाच्या पदांमधील आरक्षण हे खालील कार्यालयास लागू राहील :—

(अ) राज्य शासनाची सर्व कार्यालये

(ब) राज्य शासनाचे उपक्रम व महामंडळे

(क) स्थानिक स्वराज्य संस्था

(ड) वैधानिक मंडळे

(इ) राज्य शासनाकडून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष (उदा. जमीन, पाणी, अनुदान, कर सवलती इ.) प्राप्त होणाऱ्या संस्था

### (२) आरक्षण लागू नसलेली सेवा व कार्यालये

(अ) उच्च न्यायालय

(ब) न्यायाधिकरणे

(क) राज्यपालांचे सचिवालय

(ड) विधानमंडळ सचिवालय

(इ) महाराष्ट्र लोकसेवा आयोग

(ई) लोक आयुक्त, महाराष्ट्र

(३) नियुक्तीसाठी खेळाडूंची अर्हता

विविध कार्यालयातील नामनिर्देशनाने भरावयाच्या पदांकरिता खेळाडूंनी खालील अर्हता पूर्ण केलेली असावी :—

(अ) खेळाडू हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा व त्याला मराठीचे ज्ञान असावे.

(ब) सदर खेळाडूने सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार पदासाठी आवश्यक असलेली किमान शैक्षणिक व इतर अर्हता प्राप्त केलेली असावी.

(क) खेळाडुची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन **सदर पदासाठी असलेल्या वयोमर्यादेत ५ वर्षापर्यंत वयाची अट शिथील करण्यात यावी.**

(ड) एखाद्या खेळाडूने राज्याचे नाव उज्जवल होईल अशी कामगिरी केल्याचे निदर्शनास आल्यास, शैक्षणिक व वयाची अट शिथील करून, अशा खेळाडूस योग्य अशा पदी नियुक्त करण्याचे अधिकार शासनास राहतील.

**(४) क्रीडाविषयक अर्हता**

आरक्षित पदांवर नियुक्ती देण्यासाठी खेळाडूने क्रीडाविषयक क्षेत्रात खालीलप्रमाणे कामगिरी केलेली असावी :—

(अ) **गट-अ साठी अर्हता**

सदर पदांसाठी आंतरराष्ट्रीय स्पर्धामधील वैयक्तिक अथवा सांघिक क्रीडा स्पर्धांमध्ये भारतातर्फे प्रतिनिधीत्व करताना प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान प्राप्त केलेले असावे अथवा सुवर्ण, रौप्य किंवा कास्य पदक प्राप्त करणारा खेळाडू.

सदर स्पर्धा या संबंधित खेळांच्या आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीशी संलग्न असलेल्या आंतरराष्ट्रीय फेडरेशनने आयोजित केलेल्या असाव्यात अथवा आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीने स्वतः आयोजित केलेल्या असाव्यात.

तसेच उपरोक्त स्पर्धांव्यतिरिक्त असलेल्या स्पर्धा या मान्यताप्राप्त खेळांच्या असून आंतरराष्ट्रीय स्तरावरील मान्यताप्राप्त संघटनेने आयोजित केलेल्या असाव्यात. यामध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडूंची निवड ही राष्ट्रीय संघातून झालेली असावी. वैयक्तिकरित्या किंवा आमंत्रित स्वरूपाच्या स्पर्धांमध्ये भाग घेतलेल्या खेळाडूंचा यासाठी विचार करता येणार नाही.

(ब) **गट-ब साठी अर्हता**

सदर पदांसाठी त्या त्या खेळांच्या वैयक्तिक अथवा सांघिक क्रीडा स्पर्धांमध्ये महाराष्ट्रातर्फे प्रतिनिधीत्व करताना राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सुवर्ण, रौप्य किंवा कास्य पदक प्राप्त करणारा खेळाडू.

सदर स्पर्धा या संबंधित खेळांच्या भारतीय ऑलिम्पिक समितीशी संलग्न असलेल्या राष्ट्रीय फेडरेशनने आयोजित केलेल्या असाव्यात अथवा भारतीय ऑलिम्पिक समितीने स्वतः आयोजित केलेल्या असाव्यात. तसेच उपरोक्त स्पर्धा व्यतिरिक्त असलेल्या स्पर्धा या मान्यताप्राप्त खेळांच्या असून राष्ट्रीय स्तरावरील भारतीय ऑलिम्पिक समितीच्या मान्यताप्राप्त संघटनेने आयोजित केलेल्या असाव्यात. यामध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडूंची निवड ही राज्य संघातून झालेली असावी.

(क) **गट-क व ड साठी अर्हता**

सदर पदांसाठी त्या त्या खेळांच्या वैयक्तिक अथवा सांघिक क्रीडा स्पर्धांमध्ये किमान राज्य अजिंक्यपद स्पर्धेत प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सुवर्ण, रौप्य किंवा कास्य पदक प्राप्त करणारा खेळाडू. राज्य अजिंक्यपद स्पर्धा या सदर खेळांच्या महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनशी संलग्न असलेल्या अधिकृत राज्य संघटनेने आयोजित केलेल्या असाव्यात अथवा महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनने स्वतः आयोजित केलेल्या असाव्यात. किमान प्राविण्यापेक्षा उच्च स्तरावरील क्रीडा प्राविण्य मिळविणाऱ्या उमेदवारास प्राधान्य असावे. वैयक्तिकरित्या किंवा आमंत्रित स्वरूपाच्या स्पर्धांमध्ये भाग घेतलेल्या खेळाडूंचा यासाठी विचार करता येणार नाही.

राष्ट्रीय छात्रसेनेमध्ये (NCC) अंडर ऑफिसरची रँक मिळवून राष्ट्रीय छात्रसेनेच्या राष्ट्रीय स्पर्धांमध्ये पदके प्राप्त केलेली व्यक्ती.

**(५) आरक्षणासाठी मान्यताप्राप्त क्रीडा प्रकार**

विविध गटांसाठी मान्यताप्राप्त क्रीडा प्रकारांचा तक्ता **परिशिष्ट-अ** येथे ठेवला आहे. सदर यादीमध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी बदल करण्याचे अधिकार शासनास राहतील.

(६) <u>खेळाडूंना नियुक्ती देण्यासाठी अवलंबावयाची पद्धती</u>

गट-अ व ब साठी विविध विभागाने त्याच्या सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार नामनिर्देशनाने पदे भरण्यासाठी अवलंबिलेली कार्यपद्धती लागू राहील. महामंडळ, प्राधिकरणे, स्थानिक स्वराज्य संस्था, अनुदानित संस्था इ. संस्थांमध्ये प्रचलित शासन कार्यपद्धती लागू राहील. गट-क व ड मधील नामनिर्देशनाने भरावयाची पदे शासनाचे अस्तित्वात असलेले आदेश व कार्यपद्धती तसेच वेळोवेळी शासनाने दिलेल्या सूचना व निर्गमित केलेल्या आदेशानुसार भरण्यात यावीत.

(७) <u>सर्वसाधारण अटी व मार्गदर्शक तत्त्वे</u>

**(१) खेळाडूंसाठी असलेल्या आरक्षणातून थेट नेमलेला उमेदवार हा आरक्षण बिंदू नामावलीमध्ये त्या त्या प्रवर्गामध्ये गणला जाईल. उदा. अनुसूचित जातीचे खेळाडू व्यक्ती ही अनुसूचित जातीच्या आरक्षणाच्या बिंदूवर गणली जाईल.**

(२) राज्य शासनाच्या सेवेत यापूर्वीच असलेल्या उमेदवारांना त्यांनी क्रीडा क्षेत्रात अधिक वरिष्ठ स्थान अथवा पदक प्राप्त केल्यास व ते शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा इ. बाबींसह पात्र असल्यास वरिष्ठ जागेसाठी ते अर्ज करण्यास पात्र राहतील.

(३) खेळाडूंची कामगिरीविषयक प्रमाणपत्रे **परिशिष्ट-ब** येथे दिलेल्या प्राधिकाऱ्याने विहित नमुन्यात घेऊन, संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी प्रमणित केलेली असावीत. प्रमाणपत्राचे नमुने (फॉर्म १ ते ४) सोबत जोडले आहेत.

(४) कोणत्याही खेळाच्या स्पर्धेच्या अधिकृततेबाबत अथवा दर्जाबाबत साशंकता निर्माण झाल्यास संचालक, क्रीडा व युवक सेवा यांच्या अहवालाच्या आधारे शालेय शिक्षण व क्रीडा विभाग व सामान्य प्रशासन विभाग यांच्या संमतीने देण्यात आलेला निर्णय हा अंतिम असेल.

(५) शासकीय, निमशासकीय व शासन अनुदानित संस्था यांच्या सेवेत नियुक्तीसाठी खेळाडूंकरिता ५ % जागा आरक्षित ठेवण्यात याव्यात.

**(६) खेळाडूंच्या सदर आरक्षणाची अंमलबजावणी करताना अनु. जाती, अनु. जमाती, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास प्रवर्ग आणि खुला प्रवर्ग यांचेसाठी जी पदे उपलब्ध होतील त्या पदांपैकी त्या त्या प्रवर्गातील खेळाडूंसाठी ५ % जागा राखीव ठेवण्यात याव्यात.** ६०४

(७) खेळाडूंचे आरक्षण हे समांतर आरक्षण राहील व ते कार्यान्वित करण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाच्या परिपत्रक क्र. एसआरव्ही-१०९७/प्र.क्र. ३१/९८/१६-अ, दिनांक १६ मार्च १९९९ मधील मार्गदर्शक सुचनांनुसार कार्यवाही करावी. सदर मार्गदर्शक सुचनांमध्ये सामान्य प्रशासन विभागाकडून काही बदल केल्यास सदर बदल आपोआप लागू होतील.

(८) खेळाडूंसाठी विहित करण्यात आलेले सदर ५ % आरक्षण हे फक्त सरळसेवा भरतीसाठी अनुज्ञेय राहील.

(९) खेळाडू आरक्षण हे समांतर आरक्षण/विशेष आरक्षण असल्यामुळे ते आडवे आरक्षण आहे. समांतर आरक्षण हे कप्पीकृत आरक्षण असल्यामुळे पदे भरण्यापूर्वी, पदे निश्चित करताना तसेच भरतीची जाहिरात देताना त्या जाहिरातीतील खेळाडू आरक्षणानुसार येणाऱ्या राखीव पदांची संख्या, सामाजिक आरक्षण/उभे आरक्षण यांच्या (जसे अ.जा., अ.ज., वि.जा.(अ), भ.ज. (ब)(क)(ड), वि.मा.प्र., इ.मा.व. आणि खुला प्रवर्ग) प्रत्येक वर्गामध्ये निर्देशित करावी.

(१०) खुल्या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती/कुटुंबातील (क्रिमीलेअर) खेळाडू सदस्यांना खेळाडूंसाठी असलेले ५ % आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही. तसेच, मागासवर्गीय प्रवर्गातील इतर मागासवर्ग, भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड) या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती अथवा गटातील खेळाडू सदस्यांना खेळाडूंचे ५ % आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.

(११) इतर मागासवर्ग, भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड) यांचेकरिता उन्नत आणि प्रगत व्यक्ती अथवा गट (क्रिमीलेअर) बाबत सामाजिक न्याय विभागाने वेळोवेळी निश्चित केलेले नियम व अटी लागू राहतील.

(१२) उन्नत आणि प्रगत व्यक्ती व गट (क्रिमीलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यासाठी शासनाने जाहीर केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्याचे असावे.

(१३) महाराष्ट्र लोकसेवा आयोग अथवा इतर सक्षम प्राधिकाऱ्यांकडून खेळाडूंच्या आरक्षित पदावर नेमणूकीकरिता ज्या खेळाडूंची शिफारस होईल त्यांची प्रमाणपत्रे व त्यांनी आरक्षित पदाकरिता केलेला अर्ज संबंधित विभागांनी/कार्यालयांनी संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे तपासणीसाठी पाठवावा.

(१४) संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी प्रमाणपत्र या शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचनांनुसार आहे किंवा नाही हे तपासावे. तसेच सदर प्रमाणपत्राच्या पृष्ठयर्थ संबंधित उमेदवाराचे प्रमाणपत्र मिळण्याकरिता जी माहिती सादर केली असेल ती माहिती मूळ कागदपत्रांवरून तसेच आवश्यकता वाटल्यास गुप्तभेटी देऊन तपासून घ्यावी व सर्व माहिती योग्य असल्याचे आढळून आल्यास प्रमाणपत्र प्रमाणित करून संबंधित कार्यालयांना परत पाठवावे.

(१५) जर एखाद्या प्रमाणपत्राबाबत संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना शंका असल्यास त्यांनी याबाबतचा सविस्तर तपशील आपल्या अहवालात नमूद करून मूळ कागदपत्र मूळ विभागाकडे परत करावेत.

(१६) संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी प्रमाणपत्र तपासणीचा अहवाल एक महिन्यात संबंधित कार्यालयांना पाठवावा.

(१७) खेळाडूंचा अहवाल एक महिन्यात प्राप्त झाला नाही तर सबंधित कार्यालयांनी प्रमाणपत्र पडताळणीच्या अधिनतेने संबंधित उमेदवारास तात्पुरती नेमणूक द्यावी.

(१८) अधिकृत एकविध संघटनेच्या प्रमाणपत्रांची छाननी क्रीडा खात्यास करता यावी याकरिता सर्व राष्ट्रीय व राज्य संघटनांनी त्यांच्या उक्त स्पर्धेचे आयोजन झाल्यापासून ९० दिवसांमध्ये त्या स्पर्धेतील खेळाडूंचे संपूर्ण रेकॉर्ड/स्पर्धेचे अधिकृत निकाल व्यवस्थितरित्या जतन करून त्याची क प्रत क्रीडा संचालनालयाकडे पाठवणे आवश्यक राहील.

(१९) एकविध संघटनांकडून प्राप्त झालेल्या निकालांच्या आधारावर संचालक, क्रीडा व युवक सेवा हे खेळाडूंना प्रमाणपत्र देतील किंवा संघटनांनी दिलेले प्रमाणपत्र प्रमाणित करतील.

(२०) खेळाडूंसाठी असलेल्या ५ % आरक्षणा अंतर्गत विविध संवर्गातील विविध खात्यातील पदे भरली जात आहेत का नाही तसेच त्यांचा राहिलेला अनुशेष आदींचे संनियंत्रण संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत करण्यात येईल.

(२१) विविध खात्यांच्या मुख्यालयांनी संवर्गनिहाय रिक्त अथवा भरलेल्या पदांची माहिती विहित नमुन्यात दरवर्षी डिसेंबर अखेर संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना कळविणे बंधनकारक आहे व संचालकांनी ती एकत्रित करून शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडे प्रत्येकवर्षी ३१ मार्च अखेरपर्यंत पाठवावी.

(२२) आरक्षण ठेवत असताना अपूर्णांकात आल्यास सामान्य प्रशासन विभागाच्या आदेशाप्रमाणे त्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

(२३) एकाकी पदास आरक्षण लागू राहणार नाही.

(२४) आरक्षण हे पदनिहाय व वेतनश्रेणी निहाय असेल.

(२५) समांतर आरक्षण असल्यामुळे या संवर्गात अदलाबदल अनुज्ञेय होणार नाही.

(२६) एखादा खेळाडू उमेदवार अ गटातील नेमणूकीसाठी पात्र असून त्याने ब गटासाठी अर्ज केल्यास त्याचा विचार करण्यास हरकत नाही. परंतु, त्याचबरोबर संबंधित उमेदवाराने अ गटासाठीचे पद उपलब्ध झाल्यास अर्ज केल्यास त्याचा नियमानुसार विचार करण्यात यावा.

(२७) समांतर आरक्षण असल्यामुळे आरक्षणाचा अनुशेष पुढे नेता येणार नाही.

२. सर्व मंत्रालयीन विभागांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील शासकीय व निमशासकीय कार्यालये, महामंडळे व अनुदानित संस्था यांच्या निदर्शनास सदर शासन निर्णय आणून त्याचे योग्यप्रकारे पालन करण्याबाबत सूचना द्याव्यात.

३. सर्व मंत्रालयीन विभागांना विनंती की, सदर शासन निर्णयातील सूचना व मार्गदर्शक तत्त्वे यांचा विचार करून आवश्यकतेनुसार पदांच्या सेवाप्रवेश नियमात योग्य ती तरतूद करण्याची कार्यवाही त्वरित करावी.

४. हे आदेश सामान्य प्रशासन विभागाच्या संमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**डॉ. ज. मो. फाटक,**
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन.

(शासन निर्णय क्र. राक्रीधो-२००२/प्र.क्र. ६८/क्रीयुसे-२, दि. ३० एप्रिल २०

## परिशिष्ट - अ

### इंडियन ऑलिम्पिक असोसिएशनद्वारे मान्यताप्राप्त खेळ

(१) आट्यापाट्या
(२) बॉल बॅडमिंटन
(३) बेसबॉल
(४) बिलियर्ड ॲण्ड स्नुकर
(५) बॉलिंग
(६) ब्रिज
(७) बॉडी बिल्डर्स
(८) कॅरम
(९) सायकलपोलो
(१०) कराटे
(११) मल्लखांब
(१२) मोटर स्पोर्टस्
(१३) माऊंटेनिअरिंग
(१४) पोलो
(१५) पॉवरलिफ्टिंग
(१६) रोलर स्केटींग
(१७) रग्बी फूटबॉल
(१८) सेपाक टकरा
(१९) सॉफ्ट टेनिस
(२०) टेनिक्वाईट
(२१) थ्रोबॉल
(२२) ट्रॅम्पोलिन
(२३) टग ऑफ वॉर
(२४) स्कूल गेम
(२५) योगा
(२६) पॅरॉलॉपिक
(२७) ब्लाईंड स्पोर्टस्

**विंटर गेम्स**

(२८) लग
(२९) बॉबस्लिप
(३०) बिएथलॉन
(३१) आईस हॉकी

### इंडियन ऑलिम्पिक असोसिएशनद्वारे मान्यताप्राप्त खेळ

(१) आर्चरी
(२) ॲथलेटिक
(३) ॲक्वटिक्क
(४) बॅडमिंटन
(५) बॉक्सिंग
(६) बास्केटबॉल
(७) सायकलिंग
(८) जिम्नॅस्टिक
(९) हॅण्डबॉल
(१०) ज्युडो
(११) कबड्डी
(१२) खो-खो
(१३) लॉन टेनिस
(१४) रायफल
(१५) रोईंग
(१६) टेबल टेनिस
(१७) ट्रायथलॉन
(१८) व्हॉलीबॉल
(१९) वेटलिफ्टिंग
(२०) रेस्टलिंग
(२१) हॉकी
(२२) तायक्वांदो
(२३) फुटबॉल
(२४) हॉकी

**असोसिएट मेंबर**

(२५) कॅनॉइंग ॲण्ड कयाकिंग
(२६) मल्लखांब
(२७) फन्सिंग
(२८) कॅरम
(२९) बॉडी बिल्डर्स
(३०) आट्यापाट्या
(३१) स्केटींग

### महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनद्वारे शिफारस केलेले खेळ

(१) ब्रिज
(२) चेस
(३) क्रिकेट
(४) गोल्फ
(५) स्क्वॅश
(६) सॉफ्टबॉल

## परिशिष्ट - ब

### खेळाडूंच्या कामगिरीची प्रमाणपत्रे प्रमाणित करणाऱ्यांची यादी

| अ.क्र. | स्पर्धेचा स्तर | प्रमाणपत्र देणारे प्राधिकारी |
|---|---|---|
| १ | आंतरराष्ट्रीय स्पर्धा | संबंधित खेळाचे राष्ट्रीय फेडरेशनचे सचिव |
| २ | राष्ट्रीय स्पर्धा | संबंधित खेळांच्या राष्ट्रीय फेडरेशनचे सचिव अथवा संबंधित खेळांच्या राज्य संघटनेचे सचिव. |

प्रति,

## ANNEXURE

मा. राज्यपालांचे सचिव,

मा. मुख्यमंत्र्यांचे

Proforma of the annual statement to be filled by each Mantralaya/ Department/ Head of Department regarding recruitment of meritorious sportsmen. (Use seperate forms for each group).

STATEMENT SHOWING .............................. OF SPORTSMEN APPOINTED TO GROUP A/ B/C/D POSTS/SERVICES DURING THE YEAR ENDING 31ST DECEMBER 200

| Serial No. | Name of Mantralaya Department/Head of Department | No. of Sportsmen appointed to Group posts | | | Name of the game and No. appointed against each |
|---|---|---|---|---|---|
| | | In the Mantralaya Departments ( ) | In other Offices | Total | |
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) |

Category-wise breakup of the sportsmen appointed during the year mentioned in Col. 5.

1. Participation in International Competitions.
2. Participation in National Competitions.
3. Participation in Inter University Tournament.
4. Participation in National School Games Competitions.

( )

Under Secretary (Administration)

Head of Department........................

ANNEXURE

## FORM - 1

(Specimen forms for representing India in an International Competition in one of the recognised Games/Sports).

### NATIONAL FEDERATION/NATIONAL ASSOCIATION OF ....................

Certified to a meritorious sportsmen for employment to Group Service under the State Government.

Certified that Shri/Smt./Kumari ..........................................................................................................
Son/Wife/Daughter of Shri .............................................................................................. resident of ........................................................................................ represented the country in the game/
(complete address)

event of .......................................................................................................... Competition/Tournament held at .......................... from ............................ to ..................................

The Certificate is being given on the basis of record available in the office of National Federation/National Association of ............................................

Place ........................................ Signature ...........................................................

Date ........................................ Name ...........................................................
Designation ...........................................................

Name of the Federation /National Association ...........................................................

Address ...........................................................
Seal ...........................................................

*Note* :---This Certificate will be valid only when signed personally by the Secretary, National Federation/ National Association.

Attested by
The Authority of the Director
of Sports and Youth Services.

## FORM - 2

(for representing a State in India in an National Competition in one of the recognised Games/Sports).

STATE ASSOCIATION OF ............................................................... IN THE
GAME OF ....................................................................................................

Certified to a meritorious sportsmen for employment to Group Service under the State Government.

Certified that
Shri/Smt./Kumari ...........................................................................................
Son/Wife/Daughter of Shri ............................................................................ resident
of ........................................................................... represented the State of ..............................
(complete address)
in the game/event of .................................................................................. in the National
Competition/Tournament held at ......................................................................................
from ................................................ to ................................................

The position obtained by the individual/team in the above said Competition/Tournament was .......................................................

The Certificate is being given on the bais of record available in the office of the State Association of ..........................................

Place ..........................................

Date ..........................................

Signature ..............................................................

Name ..............................................................
Designation ......................................................

Name of the State
Association ......................................................

Address ..........................................................
Seal ..................................................................

*Note* :---This Certificate will be valid only when signed personally by the Secretary of the State Association.

Attested by
The Authority of the Director
of Sports and Youth Services.

**FORM - 3**

(for representing a State School Team in the National Games for School in one of the recognised Games/Sports).

Directorate of Sports and Youth Services of the State of Maharashtra.

Certified to a meritorious sportsmen for employment to Group Service under the State Government.

---

Certified that
Shri/Smt./Kumari..........................................................................................................
Son/Wife/Daughter of Shri ............................................................................ resident
of ............................................................ student of ..............................................................
represented the ........................................................................................... State School
Team in the game/event of .................................................................................. in the
National Games for Schools held at .................................................................................
from ................................................ to ................................................

The position obtained by the individual/team in the above said Competition/Tournament was ......................................................

The Certificate is being given on the basis of record available in the office of Directorate of Sports and Youth Services of Maharashtra.

Place ..........................................

Date ..........................................

Signature ..............................................................

Name ..............................................................
Designation ..............................................................

Name of the Federation/National
Association ..............................................................

Address ..............................................................
Seal ..............................................................

*Note* .---This Certificate will be valid only when signed personally by the Director of Additional/Joint or Deputy Director in overall charge of Sports/Games/ for Schools in the Directorate of Sports and Youth Services of the State.

The Authority of the Director
of Sports and Youth Services.

ANNEXURE

**FORM - 4**

(for the awardees in NCC performances conducted
by the Ministry of Education and Social Welfare)

Government of India/Ministry of Education and Social Welfare

Certified to a meritorious N.C.C. men for employment to a Group Service under the State Government.

---

Certified that
Shri/Smt./Kumari
Son/Wife/Daughter of Shri .................................................................................................. resident
of .......................................................................... represented the ...........................................
(complete address)
in the school game/event of ......................................................................................... in at the
National competition held at ......................................................................................................
from ................................................ to ..............................................

The Certificate is being given on the bais of record available in the Ministry of Education and Social Welfare.

Place .............................................

Date .............................................

Signature ...............................................................

Name ...............................................................
Designation ...............................................................

Name of the Federation/National
Association ...............................................................

Address ...............................................................
Seal ...............................................................

*Note* .---This Certificate will be valid only when signed personally by the Secretary or other Officer in overall charge of NCC in the Ministry of Education and Social Welfare.

Attested by
The Authority of the Director
of Sports and Youth Services.

प्रकल्पग्रस्तांना शासकीय /निमशासकीय सेवेत गट-क व गट-ड मधील पदांवर नियुक्ती देतांना उच्चतम वयोमर्यादा शिथिल करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय , क्रमांक प्रकल्प-१००६/मु.स.३९६/प्र.क्र.५६/०६/१६-अ,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ३ फेब्रुवारी,२००७.

संदर्भ : १) सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय, क्रमांक एसआरव्ही-१०७८/पीएपी/१२, दि.२२.९.१९७८.
२) सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय, क्रमांक एईएम-१०८०/३५/१६-अ, दि.२१.१.१९८०.
३) सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय, क्रमांक एसआरव्ही-१०९४/१००४/प्र.क्र.३०/१६-अ, दि.१७.११.९४.
४) सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय, क्रमांक एईएम-१०९९/प्र.क्र.४७/९९/१६-अ, दि.२४.२.२०००.
५) सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय,क्रमांकविसआ-१००१/६०/प्र.क्र.१३९/०१(भाग-१)/१६-अ, दि.३०.५.२००३.
६) सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय , क्रमांक एसआरव्ही-२००४/प्र.क्र.१९/२००४/१२, दि.१७.८.०४.
७) सामान्य प्रशासन विभाग,शासन परिपत्रक क्र.न्याप्र.१००३/९९/प्र.३/०३(भाग-२)/१६-अ, दि.२५ १०.०५

प्रस्तावना :-

प्रकल्पग्रस्त किंवा त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती यांना बृहन्मुंबई बाहेरील शासकीय व निमशासकीय सेवांमधील गट-क (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील) व गट-ड मधील पदांवर नियुक्त्या देताना संदर्भाधीन क्र.१ च्या शासन निर्णयान्वये उच्चतम वयोमर्यादा तीन वर्षांनी शिथिल करण्यात आली होती. तसेच संदर्भाधीन क्र.१ च्या शासन निर्णयान्वये बृहन्मुंबईतील शासकीय निमशासकीय कार्यालयातील गट-ड मधील पदांवरील प्रकल्पग्रस्ताच्या नियुक्त्यांसाठीही ही सवलत देण्यात आली होती. सदंर्भाधीन क्र.२ च्या शासन निर्णयान्वये प्रकल्पग्रस्तांना शासकीय व निमशासकीय सेवांमध्ये नियुक्त्या देण्यासाठी एकूण संवर्ग बळाच्या ५% पदांवर सर्वोच्च प्राथम्य देण्यात आले असून संदर्भाधीन क्र.३ च्या शासन निर्णयान्वये प्रकल्पग्रस्तांसाठी असलेल्या सर्वोच्च प्राथम्यक्रमात भूकंपग्रस्तांचाही समावेश करण्यात आला आहे. संदर्भाधीन क्र.५ च्या शासन निर्णयान्वये प्रकल्पग्रस्तांना शासकीय /निमशासकीय सेवेतील गट-क व गट-ड मधील पदांवर नियुक्त्या देण्यासाठी उच्चतम वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३५ वर्षापर्यंत व मागासवर्गीयांसाठी ४० वर्षापर्यंत शिथिल करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. आता संदर्भाधीन क्र.६ च्या शासन निर्णयान्वये शासन सेवेतील प्रवेशाची कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी ३३ वर्ष व मागासवर्गीयांसाठी ३८ वर्ष ठरविण्यात आली आहे. यामुळे प्रकल्पग्रस्तांना वयोमर्यादेत देण्यात आलेली शिथिलता अबाधित रहाणे अपेक्षित आहे. हे विचारात घेऊन शासनाने आता पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :-

प्रकल्पग्रस्तांना शासकीय /निमशासकीय सेवेतील गट-क व गट-ड मधील पदांवर नियुक्त्या देण्यासाठी सर्वसाधारण उच्च वयोमर्यादा सरसकट ४५ वर्षांपर्यंत शिथिलता देण्यात यावी. प्रकल्पग्रस्तांच्या आरक्षणामध्ये भूकंपग्रस्ताचाही समावेश असल्याने सदर आदेश भूकंपग्रस्तांनाही लागू आहेत. सदर वयोमर्यादा सरसकट शिथिल केली असल्याने मागासवर्गीय प्रकल्पग्रस्त उमेदवारांनाही ४५ वर्षापर्यंतचीच सवलत राहील.

संदर्भाधीन क्र.७ नुसार पदभरतीबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाने तसेच मा.प्रशासकीय न्यायाधिकरणाने दिलेल्या निर्देशानुसार "शासनाने शासकीय सेवेत गट-क आणि गट-ड सेवाभरतीची एकत्रित मार्गदर्शक तत्त्वे शासन परिपत्रक क्र.न्याप्र.१००३/९९/प्र.२/०३(भाग-२)/१६-अ, दि.२५ ऑक्टोबर,२००५ अन्वये निर्गमित करण्यात आली आहेत. त्यानुसारच पदभरती करणे आवश्यक आहे."

हे आदेश शासकीय सेवा, शासकीय मंडळे, महामंडळे, महानगरपालिका, नगरपरिषदा, जिल्हापरिषदा आणि ज्यांना मार्गदर्शक आदेश देण्याचा अधिकार राज्य शासनाला आहे, अशी प्राधिकरणे, सेवा व संस्था यामधील नियुक्त्यांसाठी लागू राहतील.

हे आदेश या शासन निर्णयाच्या दिनांकापासून लागू करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( परमेश्वर जकिकोरे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांना समांतर आरक्षण लागू करणे व वयोमर्यादेत सवलत देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक: पअंक-१००९/प्र.क्र. २००/२००९/१६-अ
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २७ ऑक्टोबर, २००९

वाचा :- (१) शा.नि.,सा.प्र.वि.क्र : पअंक १०९७/१७९३/प्र क्र ४/९८/१६-अ, दि.१९.३.१९९८.
(२) शा. नि.,सा.प्र.वि. क्र: पअंक १००५/प्र.क्र.३६/०५/१६-अ, दि. २६.८.२००५.
(३) शासन परिपत्रक सा.प्र.वि.क्र.:न्याप्र-१००३/९९/प्र.क्र२/०३/(भाग-२)/१६-अ, दि. २५.१०.२००५.

**प्रस्तावना :**

वरील संदर्भ क्रमांक १ येथील शासन निर्णय, दिनांक १९.३.१९९८ अन्वये "सुशिक्षित बेरोजगाराना आर्थिक सहाय्य" या योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयात काम केलेल्या पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन कर्मचाऱ्यांना शासन सेवा प्रवेशासाठी काही सवलती दिल्या आहेत.

संदर्भ क्रमांक २ येथील शासन निर्णय, दिनांक २६.८.२००५ अन्वये सदर योजनेत तीन वर्षे काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या तीन वर्षाच्या अनुभवाची नोंद केलेल्या सर्व अंशकालीन पदवीधर/पदविकाधारक उमेदवारांना शासकीय/निमशासकीय सेवेतील नियुक्त्यांमध्ये उच्च वयोमर्यादेत ४५ वर्षापर्यंत शिथिलता देण्याची सवलत दिलेली आहे.

आता वरील पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांना समांतर आरक्षण लागू करण्याची व वयोमर्यादेत आणखी सवलत देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

"सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य" या योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केलेल्या पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांना शासकीय/ निमशासकीय सेवेतील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील गट-क पदावरील सरळ सेवेने करावयाच्या नियुक्त्यांसाठी १० टक्के समांतर आरक्षण लागू करण्यात येत आहे व त्यांना सध्याच्या ४५ वर्षे वयोमर्यादेत आणखी १ वर्षाने वाढ करुन सदर सवलत ४६ वर्षापर्यंत देण्यात येत आहे."

२. सदर पदभरती मा. सर्वोच्च न्यायालय व महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, खंडपीठ औरंगाबाद यांनी दिलेल्या सूचना विचारात घेऊन निर्गमित केलेल्या संदर्भाधीन क्रमांक ३ येथे नमूद केलेल्या शासन परिपत्रक, दिनांक २५.१०.२००५ मधील मार्गदर्शक तत्त्वानुसारच करणे बंधनकारक आहे.

# विभागीय मुख्यालय त्यातील जिल्हे व तालुक्यांची माहिती

| कोकण विभाग | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जिल्हे | | तालुके | | | | | | | |
| १. | मुंबई शहर | १ | मुंबई | | | | | | |
| २. | मुंबई उपनगर | १ | अंधेरी | २ | कुर्ला | ३ | बोरीवली | | |
| ३. | ठाणे | १ | ठाणे | ३ | मुरबाड | ५ | अंबरनाथ | ७ | उल्हासनगर |
| | | २ | कल्याण | ४ | शहापूर | ६ | भिवंडी | | |
| ४. | पालघर | १ | पालघर | ३ | जव्हार | ५ | वसई | ७ | वाडा |
| | | २ | डहाणू | ४ | मोखाडा | ६ | तलासरी | ८ | विक्रमगड |
| ५. | रायगड | १ | अलिबाग | ५ | श्रीवर्धन | ९ | मुरुड | १३ | रोहा |
| | | २ | पनवेल | ६ | माणगाव | १० | उरण | १४ | तळा |
| | | ३ | खालापूर | ७ | महाड | ११ | कर्जत | १५ | पोलादपूर |
| | | ४ | सुधागड | ८ | म्हसळा | १२ | पेण | | |
| ६. | रत्नागिरी | १ | रत्नागिरी | ४ | संगमेश्वर | ६ | मंडणगड | ८ | चिपळून |
| | | २ | दापोली | ५ | राजापूर | ७ | गुहागर | ९ | लांजा |
| | | ३ | खेड | | | | | | |
| ७. | सिंधुदुर्ग | १ | कणकवली | ३ | सावंतवाडी | ५ | वेंगुर्ला | ७ | देवगड |
| | | २ | कुडाळ | ४ | दोडा मार्ग | ६ | मालवाण | ८ | वैभववाडी |
| नाशिक विभाग | | | | | | | | | |
| ८. | नाशिक | १ | नाशिक | ५ | नांदगाव | ९ | देवळा | १३ | चांदवड |
| | | २ | दिंडोरी | ६ | निफाड | १० | पेठ | १४ | येवले |
| | | ३ | कळवण | ७ | इगतपुरी | ११ | सुरगाणा | १५ | सिन्नर |
| | | ४ | मालेगाव | ८ | त्र्यंबकेश्वर | १२ | बागलाण | | |
| ९. | धुळे | १ | धुळे | २ | साक्री | ३ | सिंदखेडा | ४ | शिरपूर |

## विभागीय मुख्यालय त्यातील जिल्हे व तालुक्यांची माहिती

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १०. | नंदूरबार | १ | नंदुरबार | ३ | अक्राणी | ५ | अक्कलकुवा | ६ | तळोदा |
| | | २ | शहादा | ४ | नवापूर | | | | |
| ११. | जळगाव | १ | जळगाव | ५ | पाचोरा | ९ | एरंडोल | १३ | चाळीसगाव |
| | | २ | यावल | ६ | चोपडा | १० | अंमळनेर | १४ | पारोळा |
| | | ३ | मुक्ताईनगर | ७ | रावेर | ११ | भुसावळ | १५ | धरणगाव |
| | | ४ | बोदवड | ८ | भडगाव | १२ | जामनेर | | |
| १२. | अहमदनगर | १ | नगर | ५ | श्रीगोंदे | ९ | अकोला | १२ | कर्जत |
| | | २ | श्रीरामपूर | ६ | राहुरी | १० | कोपरगाव | १३ | पारनेर |
| | | ३ | शेवगाव | ७ | रहाता | ११ | पाथर्डी | १४ | संगमनेर |
| | | ४ | जामखेड | ८ | नेवासा | | | | |
| | | | | | **पुणे विभाग** | | | | |
| १३. | पुणे | १ | पुणे शहर | ५ | बारामती | ९ | भोर | १२ | पुरंदर |
| | | २ | खेड | ६ | हवेली | १० | मुळशी | १३ | वेल्हे |
| | | ३ | जुन्नर | ७ | आंबेगाव | ११ | इंदापूर | १४ | मावळ |
| | | ४ | दौंड | ८ | शिरुर | | | | |
| १४. | सातारा | १ | सातारा | ४ | खटाव | ७ | पाटण | १० | कराड |
| | | २ | खंडाळा | ५ | वाई | ८ | महाबळेश्वर | ११ | जावळी |
| | | ३ | फलटण | ६ | कोरेगाव | ९ | माण | | |
| १५. | सांगली | १ | मिरज | ४ | जत | ७ | आटपाडी | ९ | वाळवा |
| | | २ | पलूस | ५ | तासगाव | ८ | कवठे महांकाळ | १० | शिराळा |
| | | ३ | खानापूर | ६ | कडेगाव | | | | |

# विभागीय मुख्यालय त्यातील जिल्हे व तालुक्यांची माहिती

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १६. | सोलापूर | १ | उत्तर सोलापूर | ४ | मोहोळ | ७ | माढा | १० | सांगोले |
| | | २ | बार्शी | ५ | पंढरपूर | ८ | अक्कलकोट | ११ | करमाळा |
| | | ३ | दक्षिण सोलापूर | ६ | माळशिरस | ९ | मंगळवेढे | | |
| १७. | कोल्हापूर | १ | करवीर | ४ | शिरोळ | ७ | चंदगड | १० | राधानगरी |
| | | २ | पन्हाळा | ५ | कागल | ८ | आजरा | ११ | गगनबावडा |
| | | ३ | हातकणंगले | ६ | गडहिंग्लज | ९ | भुदरगड | १२ | शाहूवाडी |
| | | | | | **औरंगाबाद विभाग** | | | | |
| १८. | औरंगाबाद | १ | औरंगाबाद | ४ | सोयगाव | ६ | गंगापूर | ८ | वैजापूर |
| | | २ | खुलादाबाद | ५ | सिल्लोड | ७ | पैठण | ९ | फुलंब्री |
| | | ३ | कन्नड | | | | | | |
| १९. | जालना | १ | जालना | ३ | परतूर | ५ | भोकरदन | ७ | धनसांवगी |
| | | २ | अंबड | ४ | जाफ्राबाद | ६ | बदनापूर | ८ | मंठा |
| २०. | परभणी | १ | परभणी | ४ | पाथ्री | ६ | मानवत | ८ | सोनपेठ |
| | | २ | जिंतूर | ५ | सेलू | ७ | पालम | ९ | पूर्णा |
| | | ३ | गंगाखेड | | | | | | |
| २१. | हिंगोली | १ | हिंगोली | ३ | बसमत | ४ | सेनगाव | ५ | औंढा नागनाथ |
| | | २ | कळमनुरी | | | | | | |
| २२. | बीड | १ | बीड | ४ | अंबेजोगाई | ७ | आष्टी | १० | परळी |
| | | २ | गेवराई | ५ | केज | ८ | धारुर | ११ | वडवणी |
| | | ३ | माजलगाव | ६ | पाटोदा | ९ | शिरुर (कासार) | | |

## विभागीय मुख्यालय त्यातील जिल्हे व तालुक्यांची माहिती

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २३. | नांदेड | १ | नांदेड | ५ | बिलोली | ९ | लोहा | १३ | उमरी |
| | | २ | हदगाव | ६ | देगलूर | १० | अर्धापूर | १४ | धर्माबाद |
| | | ३ | किनवट | ७ | मुखेड | ११ | हिमायतनगर | १५ | नायगाव |
| | | ४ | भोकर | ८ | कंधार | १२ | माहूर | १६ | मुदखेड |
| २४. | उस्मानाबाद | १ | उस्मानाबाद | ३ | नविन लोहारा | ५ | भूम | ७ | कळंब |
| | | २ | उमरगा | ४ | तुळजापूर | ६ | परांडा | ८ | वाशी |
| २५. | लातूर | १ | लातूर | ४ | निलंगा | ७ | देवणी | ९ | शिरुर (अनंतपाळ) |
| | | २ | अहमदपूर | ५ | औसा | ८ | रेणापूर | १० | जळकोट |
| | | ३ | उदगीर | ६ | चाकूर | | | | |
| | | | | | **अमरावती विभाग** | | | | |
| २६. | बुलढाणा | १ | चिखली | ५ | मोताळा | ८ | संग्रामपूर | ११ | मेहकर |
| | | २ | देऊळगाव राजा | ६ | नांदुरा | ९ | खामगाव | १२ | सिंदखेड राजा |
| | | ३ | बुलढाणा | ७ | जळगाव (जामोद) | १० | शेगाव | १३ | लोणार |
| | | ४ | मलकापूर | | | | | | |
| २७. | अकोला | १ | अकोला | ३ | तेल्हारा | ५ | पातूर | ७ | मूर्तिजापूर |
| | | २ | बार्शी टाकळी | ४ | अकोट | ६ | बाळापूर | | |
| २८. | वाशीम | १ | वाशीम | ३ | रिसोड | ५ | मानोरा | ६ | कारंजा |
| | | २ | मालेगाव | ४ | मंगरुळपीर | | | | |
| २९. | अमरावती | १ | अमरावती | ५ | चांदूर बाजार | ९ | तिवसा | १२ | अंजनगाव (सुर्जी) |
| | | २ | नांदगाव खांडेश्वर | ६ | मोर्शी | १० | धामणगाव रेल्वे | १३ | चिखलदरा |
| | | ३ | भातकुली | ७ | वरुड | ११ | दर्यापूर | १४ | धारणी |
| | | ४ | अचलपूर | ८ | चांदूर रेल्वे | | | | |

# विभागीय मुख्यालय त्यातील जिल्हे व तालुक्यांची माहिती

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३०. | यवतमाळ | १ | यवतमाळ | ५ | राळेगाव | ९ | पुसद | १३ | नेर |
| | | २ | बाभुळगाव | ६ | घाटंजी | १० | महागाव | १४ | दिग्रस |
| | | ३ | कळंब | ७ | वणी | ११ | उमरखेड | १५ | आर्णी |
| | | ४ | केळापूर | ८ | मोरेगाव | १२ | दारव्हा | १६ | झरी-जामडी |
| | | | | | नागपूर विभाग | | | | |
| ३१. | वर्धा | १ | वर्धा | ३ | आर्वी | ५ | कारंजा | ७ | हिंगणघाट |
| | | २ | देवळी | ४ | सेलू | ६ | आष्टी | ८ | समुद्रपूर |
| ३२. | नागपूर | १ | नागपूर ग्रामीण | ५ | काटोल | ९ | मौदा | १२ | उमरेड |
| | | २ | नागपूर शहर | ६ | नरखेड | १० | रामटेक | १३ | भिवापूर |
| | | ३ | कामठी | ७ | सावनेर | ११ | पारशिवनी | १४ | कुही |
| | | ४ | हिंगणा | ८ | कळमेश्वर | | | | |
| ३३. | भंडारा | १ | भंडारा | ३ | मोहाडी | ५ | लाखांदूर | ७ | तुमसर |
| | | २ | पवनी | ४ | साकोली | ६ | लाखनी | | |
| ३४. | गोंदिया | १ | गोंदिया | ३ | अर्जुनी मोरगांव | ५ | देवरी | ७ | आमगांव |
| | | २ | गोरेगाव | ४ | तिरोडा | ६ | सडक अर्जुनी | ८ | सालेकसा |
| ३५. | चंद्रपूर | १ | चंद्रपूर | ४ | वरोरा | ९ | सिंदेवाही | १३ | बल्लारपूर |
| | | २ | गोंडपिंपरी | ६ | चिमूर | १० | नागभीड | १४ | पोंभुर्णा |
| | | ३ | मूल | ७ | भद्रावती | ११ | राजुरा | १५ | जिवती |
| | | ४ | सावली | ८ | ब्रम्हापुरी | १२ | कोरपना | | |
| ३६. | गडचिरोली | १ | गडचिरोली | ४ | आरमोरी | ७ | मूलचेरा | १० | भामरागड |
| | | २ | चामोर्शी | ५ | सिरोंचा | ८ | अहेरी | ११ | देसाईगंज |
| | | ३ | धानोरा | ६ | कुरखेडा | ९ | एटापल्ली | १२ | कोरची |

**शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई**